❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | मंगळवार, दि. ०८ सप्टेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २५४ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून
दै. संध्याच्या
यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

**संध्या प्रहार**




# मराठा विद्यार्थ्यांसाठी ४ महत्त्वाचे जीआर

**• ओबीसीप्रमाणे शैक्षणिक सवलती • जरांगेंच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारचा मोठा निर्णय • मृतांच्या वारसांना नोकरी**

■ मुंबई (दै. संध्या)

मराठा आरक्षणाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांचे आंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू असताना राज्य सरकारच्या पातळीवर महत्त्वाच्या हालचालींना वेग आला आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने मराठा, कुणबी आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातील विद्यार्थी आणि तरुणांसाठी चार महत्त्वाचे शासकीय आदेश जारी केले आहेत. शिक्षणातील सवलतींपासून वसतिगृह निर्वाह भत्ता, परदेशी शिक्षणासाठीची शिष्यवृत्ती आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षणापर्यंत या निर्णयांचा समावेश आहे. यामुळे आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने काही मागण्यांच्या संदर्भात तातडीने प्रशासकीय पावले उचलल्याचे चित्र आहे. मात्र, मराठा आरक्षणाचा मूळ प्रश्न, कुणबी नोंदी आणि संबंधित मागण्यांवर अंतिम तोडगा निघालेला नसल्याने आंदोलनाच्या पुढील भूमिकेकडेही लक्ष लागले आहे.



सरकारच्या निर्णयांपैकी सर्वात महत्त्वाचा निर्णय तंत्रशिक्षण घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांशी संबंधित आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाने राज्यातील सर्व विभागीय कार्यालये आणि विद्यापीठांना याबाबत निर्देश दिले आहेत. शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीय (OBC) विद्यार्थ्यांप्रमाणे उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सवलती आणि सोयी-सुविधांचा लाभ देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याचा थेट फायदा तंत्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना होऊ शकतो. शिक्षणाचा खर्च, विविध शैक्षणिक सवलती आणि उपलब्ध योजनांचा लाभ घेण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. विशेष म्हणजे, या निर्णयाची अंमलबजावणी संबंधित विभागीय कार्यालये आणि विद्यापीठांनी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे केवळ घोषणा न राहता प्रत्यक्ष लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांवर असणार आहे.

दुसरा महत्त्वाचा निर्णय विद्यार्थ्यांच्या प्रलंबित वसतिगृह निर्वाह भत्त्याबाबत आहे. EBC, EWS आणि SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत देय असलेल्या प्रलंबित रकमेसाठी 200 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पावसाळी अधिवेशनातील पुरवणी मागणीद्वारे हा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. संबंधित पात्र विद्यार्थ्यांना हा प्रलंबित निधी वितरित करण्याच्या दृष्टीने उच्च व तंत्रशिक्षण विभागाने आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या आणि निर्वाह भत्त्याची रक्कम प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा मिळण्याची शक्यता आहे. विशेषतः ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या अडचणीच्या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, भोजन आणि इतर दैनंदिन खर्चाचा प्रश्न महत्त्वाचा असतो. त्यामुळे 200 कोटींच्या निधीमुळे प्रलंबित देयकांचा प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा आहे.

### हैदराबाद गॅझेटिअरमधील नोंदी गावपातळीवर आणण्याच्या हालचाली

दरम्यान, मराठा आरक्षणाच्या आंदोलनातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कुणबी नोंदी आणि हैदराबाद गॅझेटिअरशी संबंधित नोंदी. या नोंदींची गावपातळीवर उपलब्धता करून देण्याच्या दृष्टीनेही प्रशासकीय हालचाली सुरू आहेत. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मराठवाड्यातील जिल्ह्यांतील अधिकारी आणि विभागीय आयुक्तांसोबत यासंदर्भात आढावा घेतल्याचे सांगितले जात आहे. ज्या गावांमध्ये कुणबी किंवा संबंधित जुन्या नोंदी उपलब्ध झाल्या आहेत, त्या गावांमध्ये ग्रामपंचायतीच्या माध्यमातून त्या नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नोंदी नागरिकांना मोबाईलवर पाहता याव्यात, यासाठी जिल्हा प्रशासनाच्या संकेतस्थळावर नोंदी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहितीही देण्यात आली आहे. यामुळे नागरिकांना जुन्या नोंदी शोधण्यासाठी केवळ कार्यालयांमध्ये फेऱ्या मारण्याची गरज कमी होऊ शकते. गावपातळीवर नोंदी उपलब्ध झाल्यास संबंधित नागरिकांना त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी मदत होऊ शकते.

## थोडक्यात...

### ठाकरे गटाचे १४ आमदार शिंदेंच्या संपर्कात

**मुंबई : दैनिक संध्या**

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा पक्षफुटीच्या चर्चांना उधाण आले आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार मुरजी पटेल यांनी ठाकरे गटाच्या 14 आमदारांबाबत मोठा दावा केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. ठाकरे गटाचे 14 आमदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असून, शिंदे यांच्याकडून ग्रीन सिग्नल मिळताच 'ऑपरेशन टायगर-4' सुरू होईल, असा दावा पटेल यांनी केला आहे. एवढेच नव्हे, तर ठाकरे गटाच्या खासदारांनंतर आता आमदार आणि त्यानंतर नगरसेवकही शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश करतील, असा दावा मुरजी पटेल यांनी केला. त्यामुळे आगामी काही दिवसांत महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या राजकीय घडामोडी होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र, 14 आमदार शिंदे गटाच्या संपर्कात असल्याच्या दाव्याला अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही. मुरजी पटेल यांनी माध्यमांशी बोलताना ठाकरे गटातील आमदारांच्या संभाव्य पक्षांतराबाबत थेट दावा केला. ठाकरे गटाकडे सध्या विधानसभेत 20 आमदार असून त्यापैकी 14 आमदार एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याचे त्यांनी म्हटले. शिंदे यांनी हिरवा कंदील दिल्यानंतर या आमदारांच्या पक्षप्रवेशाला सुरुवात होईल, असे पटेल म्हणाले. 'लवकरच तुम्हाला हे दिसेल,' असे सांगत त्यांनी या संभाव्य राजकीय घडामोडींचे संकेत दिले. पटेल यांच्या म्हणण्यानुसार, सध्या शिंदे गटाचे लक्ष प्रामुख्याने ठाकरे गटातील आमदारांकडे आहे. आमदारांनंतर ठाकरे गटातील काही नगरसेवकही शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करू शकतात, असा दावाही त्यांनी केला. यामुळे 'ऑपरेशन टायगर-4'ची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. मात्र, या दाव्याची सत्यता प्रत्यक्षात पक्षांतराची घोषणा झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे.

### भांडणं लावण्यापलीकडे सरकारला काम नाही!

**नागपूर : दैनिक संध्या**

महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाने पाठ फिरवल्याने शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत असताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. सरकारचे लक्ष दुष्काळ, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे नसून दोन धर्मांमध्ये भांडणे लावण्याकडे आहे, असा आरोप त्यांनी केला. "दोन धर्मांत भांडणं निर्माण करण्याचं आणि देश लुटण्याचं एवढंच सरकारचं काम आहे. याच्या पलीकडे या सरकारला कुठलाही विषय नाही," अशी टीका वडेट्टीवार यांनी नागपुरात माध्यमांशी बोलताना केली. विदर्भासह मराठवाडा आणि राज्यातील काही भागांमध्ये पावसाची तूट कायम आहे. खरीप पिकांच्या वाढीसाठी सप्टेंबरमधील पाऊस अत्यंत महत्त्वाचा मानला जात असताना पाऊस कमी झाल्यास शेतकऱ्यांसमोरील संकट आणखी गडद होण्याची शक्यता आहे. देशातही सप्टेंबरमधील पावसाची स्थिती चिंताजनक राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून सोयाबीन, कापूस, मका आणि कडधान्यांसारखी पिके सध्या महत्त्वाच्या वाढीच्या टप्प्यात आहेत. वडेट्टीवार यांनी विदर्भातील परिस्थितीचा उल्लेख करताना कृत्रिम पाऊस पाडण्याची मागणी होत असल्याचे सांगितले. सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, पुढील काळात पाण्याअभावी आणखी नुकसान होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. "दुष्काळाची गंभीर स्थिती आहे. कृत्रिम पाऊस पाडावा, अशी मागणी होते आहे.

## एक क्षणही पदावर राहणार नाही

### आरोपानंतर विवेक भीमनवार यांचे थेट आव्हान

■ मुंबई (दै. संध्या)

नीट परीक्षेचा पेपरफुटी प्रकरण ताजे असतानाच एमपीएससीच्या पेपरफुटीचे प्रकरण समोर आले. त्यानंतर राज्यात विद्यार्थ्यांनी निदर्शने करण्यास सुरुवात केली. आज पुण्यात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच विरोधी पक्षातील नेत्यांनी मोर्चा काढला. सरकारसह महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्यावर देखील आरोप करण्यात आले. त्यावर आता भीमनवार यांनी निवेदन देत त्यांच्यावर होत असलेले आरोप फेटाळून लावले आहेत. विवेक भीमनवार म्हणाले, एमपीएससी पेपरफुटीच्या प्रकरणात सातत्याने अनुचित आरोप माझ्याविरोधात केले जात आहेत. यासंदर्भात दि. 2 सप्टेंबर 2026 रोजी स्वयंस्पष्ट निवेदन जारी करण्यात आले होते. औषध निरीक्षक परीक्षेशी संबंधित प्रश्नपत्रिका फुटीचा घटनाक्रम हा मी रुजू होण्यापूर्वीचा आहे, हे मी आधीच त्यात स्पष्ट केले आहे. याबाबत आयोगाने तक्रार प्राप्त होताच पोलिसांत तक्रार केली आणि त्याचा तपास सुरु आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती न होण्यासाठी एक उच्चस्तरिय समिती एमपीएससीने गठीत केली आहे आणि राज्य सरकारनेही एक उच्चाधिकार समिती गठीत करुन विभागीय स्तरावर जाऊन विद्यार्थी,



पालक आणि शिक्षक यांच्याशी सल्लामसलतीची प्रक्रिया आरंभ केली आहे. पुढे विवेक भीमनवार म्हणाले, वस्तुस्थिती स्पष्ट करुनही सातत्याने माझ्याविरोधात वैयक्तिक आणि प्रतिमा मलिन करणारे राजकीय आरोप होत असल्याने मी अत्यंत व्यथित आहे. मी पदाची सूत्रे स्वीकारल्यापासून एमपीएससीमध्ये अनेक सुधारणा केल्या. स्पर्धा परीक्षेच्या 8 आणि सरळसेवा भरतीच्या 76 चाळणी परीक्षा अशा एकूण 84 परीक्षा यशस्वीपणे घेतल्या आहेत. शासनाकडून मागणी होण्यापासून ते निकाल जाहीर होईस्तोवर अनेक गुणात्मक आणि रचनात्मक सुधारणा केल्या. यामुळे 18 ते 21 दिवसांत निकाल जाहीर करणे शक्य झाले. निकाल जाहीर होण्यातील प्रदीर्घ विलंब कमी केला आणि 1 महिन्यात निकाल जाहीर करता येईल, असे नियोजन केले असल्याची माहिती भीमनवार यांनी दिली आहे.

## सरकार जाणूनबुजून हलगर्जीपणा करतंय : मनोज जरांगे

### आंदोलकांवर हल्ल्याचा कट; फडणवीसांना बदनाम करण्याचे षड्यंत्र

■ आंतरवाली सराटी (दै. संध्या)

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसले आहेत. आज त्यांच्या आंदोलनाचा 10 वा दिवस आहे. गेली 2 दिवस त्यांनी उपचार आणि पाणी न घेण्याचा निर्णय घेतल्याने त्यांची प्रकृती खराब झाली आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठा आरक्षणाबद्दल सरकारकडून मुद्दाम हलगर्जीपणा सुरू करण्यात आला आहे. मराठा समाज संपला पाहिजे म्हणून हे सर्व सुरू आहे. यामुळेच मराठा समाज संतापला आहे. सरकार 15 दिवसांमध्ये काहीच करू शकले नाही. 29 जूनला सांगितले होते की उपोषणाला बसण्याची वेळ येऊ देऊ नका. पण सरकारकडून 3 महिन्यात काहीही केले नाही.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, हे आंदोलन दाबण्यासाठी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांची मिलीभगत आहे. छत्रपती संभाजीनगरात सत्ताधारी मंत्र्यांची बैठक होऊन हे आंदोलन मोडीत काढण्याचा कट रचला गेला आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये शिंदेंच्या मंत्र्यांची एक बैठक पार पडली, ज्यामध्ये हे आंदोलन कसे मोडीत काढता येईल यावर सविस्तर चर्चा झाली. या कटाचाच एक भाग म्हणून मराठा समाज जेव्हा मुंबईकडे कूच करेल, तेव्हा पोलिसांकडून आंदोलकांवर अचानक



हल्ला करवायचा, जेणेकरून गृहमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस थेट बदनाम होतील. या संपूर्ण कटात भाजपचे चंद्रशेखर बावनकुळे यांचीही दोन माणसे सहभागी आहेत, असा आरोप जरांगे पाटील यांनी केला आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, केवळ शिंदेंचे मंत्रीच नाही, तर फडणवीस यांच्याही डोक्यात हाच विचार सुरू आहे. मराठा आंदोलनाला हिंसक वळण देऊन आंदोलन बदनाम करणे आणि मराठा समाजाचा आवाज कायमचा दाबणे हाच या सत्ताधाऱ्यांचा छुपा अजेंडा आहे. जर मुंबईला जाताना आपल्या बांधवांना आडवा-आडवी झाली किंवा त्यांचे रक्त निघाले तर 10 मिनिटात महाराष्ट्र बंद पाडा. कारण ही सर्व मुलं आपल्यासाठी मुंबईत जात आहे. पोलिसांनी कितीही त्रास दिला तर त्यांना मराठा बांधवांनी त्यांना त्रास द्यायचा नाही. बॅरिकेट लावले तर बाजूला सरकत पुढे जायचे. शांततेत मुंबईकडे जायचे, कोणालाही मोजायचे नाही. पोलिसांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केलाच तर पळू नका, त्यांना सांगा आम्ही वर्दीचा आदर करतो म्हणून शांत आहोत.

### शिंदेंचे आणि त्यांच्या मंत्र्यांचे हाल सुरू

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात केस होत नव्हती. थेट जीव जात होता पण मा जिजाऊंनी कधीच मागे पाऊल टाकले नाही. त्यांनी थेट लढायचे ठरवले हा आपला इतिहास आहे. ज्यांना काही केस पडण्याची भीती असेल त्यांनी माझ्यासोबत मुंबईत येऊच नये. महाराष्ट्रात जर कोणीच चांगले जगू शकत नाही, मग सरकाराचा माज उतरवण्याचे काम केले पाहिजे. देवेंद्र फडणवीस मुघलांपेक्षा जास्त वाईट परिस्थिती आणतो, तो लोकांना उद्धवस्त करत आहे. जो विरोधात बोलतो त्यांच्यामागे ईडी लावतात. इतकी हिटलरशाही तुम्ही कसे सहन करतात. शिंदेंचे आणि त्यांच्या मंत्र्यांचे हाल सुरू आहेत.

# एमपीएससी विद्यार्थ्यांचा पुण्यात आक्रोश मोर्चा

### *सुप्रिया सुळे आणि रोहित पवारांसह हजारो विद्यार्थी रस्त्यावर; सखोल चौकशीची मागणी*

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभारातील कथित ढिसाळपणा, पेपरफुटी आणि निकालातील गोंधळाविरोधात आज पुण्यात एमपीएससीच्या हजारो विद्यार्थ्यांनी भव्य 'आक्रोश मोर्चा' काढला. ओंकारेश्वर मंदिर ते पुणे जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), शिवसेना (ठाकरे गट), काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांसारख्या प्रमुख राजकीय पक्षांनी या आंदोलनाला आपला जाहीर पाठिंबा दर्शवला. मोर्चामध्ये राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार आणि स्थानिक ठाकरे गटाचे शिवसेना नेते हे प्रामुख्याने सहभागी झाले.

मोर्चात सहभागी झाल्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली. "मुलं रस्त्यावर उतरलेली असताना सरकारने त्यांचे ऐकून तरी घ्यायला हवे, चर्चेला बसायला हवे. विद्यार्थ्यांचा अर्धा वेळ अभ्यासिकेऐवजी रस्त्यावर आंदोलने करण्यात जात आहे, हे सरकारचे मोठे अपयश आहे," असा घणाघात सुळेंनी केला. पेपरफुटीबाबत बोलताना त्या म्हणाल्या की, "देशात 'टोफेल' आणि 'जीआरई' सारख्या परीक्षा होतात, तिथे पेपर फुटत नाहीत. एआय (AI) तंत्रज्ञान असतानाही पेपर फुटणे थांबत नाही, यावर माझा विश्वास नाही." तसेच, देशात आणि



राज्यात सुरू असलेल्या आर्थिक संकटावरून लक्ष विचलित करण्यासाठीच सरकार दोन धर्मांमध्ये भांडणे लावत असल्याचा आरोपही त्यांनी केला. सरकारने हट्टीपणा सोडून जबाबदार व्यक्तीला पाठवून विद्यार्थ्यांशी चर्चा करावी आणि जंतर-मंतर सारखा उद्रेक टाळावा, असे आवाहन त्यांनी केले.

"डिपार्टमेंटल PSI परीक्षेत १५० जणांनी मास कॉपी केली असून, FDA पेपरफुटीत अवर सचिव अभिजित लेंडवेसारखे उच्चपदस्थ अधिकारी सहभागी आहेत," असा दावा पवार यांनी केला. "एमपीएससीच्या शुद्धीकरणाशिवाय हा लढा थांबणार नाही," असा इशारा त्यांनी दिला. आक्रोश मोर्चात सहभागी विद्यार्थ्यांनी एमपीएससीच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करत प्रमुख मागण्या मांडल्या. एमपीएससी अध्यक्ष आणि सचिवांनी तातडीने राजीनामा देऊन स्वच्छ प्रतिमेच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. २०२२ पासून झालेल्या सर्व परीक्षांची आणि गट-ब परीक्षेतील आक्षेपांची चौकशी व्हावी. अटकेत असलेला अवर सचिव अभिजित लेंडवे याच्या कार्यकाळातील सर्व परीक्षांचे, तसेच 'डीआय'मधील संशयास्पद निकालांचे फॉरेन्सिक ऑडिट करावे. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी होणारी गट-क पूर्व परीक्षा पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने पार पाडावी आणि लघुलेखक पद पुन्हा सुरू करावे. लेंडवे, मराठे आणि नखाते यांच्या नियुक्त्यांची चौकशी करावी आणि त्यांच्या संपर्कात असलेल्या उमेदवारांचे संपर्क तपासले जावेत. "एमपीएससीवर आमचा आई-वडिलांपेक्षा जास्त विश्वास होता, पण आता तो संपत चालला आहे. यापुढे पेपर फुटू नयेत म्हणून सरकारने ठोस उपाययोजना कराव्यात," अशी संतप्त प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी दिली.

### रोहित पवारांचे गंभीर आरोप

आमदार रोहित पवार यांनी एमपीएससी अध्यक्षांवर हजारो कोटींच्या भ्रष्टाचाराचे धक्कादायक आरोप केले आहेत. त्यांनी ट्विटद्वारे खालील मुद्दे मांडले.

- HSRP नंबरप्लेट कंत्राटात ₹1800 कोटींचा घोटाळा.
- VLT उपकरणांच्या कंत्राटात वाहनामागे ₹5000-₹10000 अतिरिक्त दर आकारून हजारो कोटींची लूट.
- बोगस रिफ्लेक्टर आणि QR कोडच्या माध्यमातून हजारो कोटींची लूट.
- खोटी कागदपत्रे व चॅसिस क्रमांक बदलून बेकायदेशीर नोंदणीतून शासनाचा महसूल बुडवला.
- १८७ इंटरसेप्टर आणि रडार प्रणाली असलेल्या वाहनांच्या खरेदीत कोट्यवधींचा भ्रष्टाचार (ACB कडे गुन्हा दाखल).
- अंधेरीत तब्बल 1.25 लाख ड्रायव्हिंग लायसन्स टेस्ट न घेता मंजूर केले.
- सीमा तपासणी नाक्यांवर 'Entry' च्या नावाखाली वसुली आणि बदल्या-पदोन्नतीमध्ये भ्रष्टाचार.



## धनगर समाजाचा मुंबईत आक्रोश

■ मुंबई(दै. संध्या)

धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या प्रमुख मागणीसाठी राज्यभर सुरू असलेल्या आंदोलनाची धग आता मुंबईतही पाहायला मिळाली. आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वाखाली धनगर समाजाच्या वतीने मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयावर 'आक्रोश मोर्चा' काढण्यात आला. मोठ्या संख्येने समाजबांधव या मोर्चात सहभागी झाले होते. यावेळी आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारने ठोस निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी करण्यात आली. धनगर समाजाला आरक्षण देण्याचा प्रश्न केवळ न्यायालयीन प्रक्रियेपुरता मर्यादित न ठेवता सरकारने आपल्या घटनात्मक अधिकारांचा वापर करून त्यावर मार्ग काढावा. सर्वोच्च न्यायालयाच्या माध्यमातून मार्ग निघत असेल तर तो मार्ग स्वीकारावा; अन्यथा सरकारच्या अधिकारात जे काही शक्य आहे, त्या मार्गाने धनगर समाजाला आरक्षण द्यावे. मात्र आरक्षणाची अंमलबजावणी झालीच पाहिजे, अशी भूमिका गोपीचंद पडळकर यांनी मांडली. मुंबईतील आंदोलनादरम्यान पडळकर यांनी धनगर आरक्षणाच्या मागणीसोबत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि वीर शिंग्रोबा धनगर यांच्या स्मृतीशी संबंधित मागण्याही सरकारसमोर मांडल्या.

## संपादकीय

# सवलतींच्या घोषणांपलीकडे मराठा आरक्षणाचा अंतिम तोडगा हवा!

मराठा आरक्षणाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू असताना राज्य सरकारने मराठा, कुणबी आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातील विद्यार्थी व तरुणांसाठी घेतलेले निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहेत. तंत्रशिक्षणातील सवलती, वसतिगृह निर्वाह भत्त्यासाठी २०० कोटी रुपयांचा निधी, परदेशी शिक्षणासाठीच्या शिष्यवृत्ती धोरणातील बदल आणि १,४४० मराठा-कुणबी तरुणांना मोफत वाहनचालक प्रशिक्षण या निर्णयांमधून सरकारने आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काही मागण्यांकडे तातडीने लक्ष दिल्याचे दिसते. मात्र, या निर्णयांचे स्वागत करतानाच एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतोमराठा समाजाच्या आरक्षणाच्या मूळ प्रश्नाचे काय? सरकारच्या निर्णयांकडे केवळ आंदोलन शांत करण्यासाठी केलेली तात्पुरती प्रशासकीय मलमपट्टी म्हणून पाहिले जाऊ नये. कारण मराठा समाजाचा प्रश्न हा केवळ शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्ती किंवा रोजगार प्रशिक्षणापुरता मर्यादित नाही. आरक्षण, कुणबी नोंदी, प्रमाणपत्रांचा प्रश्न, शिक्षण व रोजगारातील संधी आणि सामाजिक-आर्थिक मागासलेपणाचा प्रश्न या सर्व बाबी एकमेकांशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे शासनाने घेतलेल्या प्रत्येक निर्णयाची परिणामकारक अंमलबजावणी आणि त्यापुढील व्यापक धोरणात्मक निर्णय अधिक महत्त्वाचे ठरतात. तंत्रशिक्षण घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून OBC विद्यार्थ्यांप्रमाणे उपलब्ध सवलती आणि सोयी-सुविधांचा लाभ देण्याचा निर्णय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. शिक्षणाच्या वाढत्या खर्चाच्या काळात शुल्क, शैक्षणिक साहित्य, विविध योजना आणि अन्य सुविधा यांचा लाभ मिळणे गरजेचे आहे. मात्र शासन आदेश काढणे आणि त्याचा लाभ विद्यार्थ्याच्या खात्यात किंवा प्रत्यक्ष शैक्षणिक जीवनात पोहोचणे यात मोठे अंतर असते. अनेकदा योजनांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही, कागदपत्रांची गुंतागुंत असते किंवा प्रशासकीय पातळीवर विलंब होतो. त्यामुळे या निर्णयाच्या अंमलबजावणीवर काटेकोर देखरेख आवश्यक आहे. वसतिगृह निर्वाह भत्त्याच्या प्रलंबित रकमेसाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करणे हा देखील महत्त्वाचा निर्णय आहे. ग्रामीण भागातून शहरांमध्ये शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, भोजन आणि दैनंदिन खर्च हा मोठा आर्थिक भार असतो. अशा विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता वेळेवर मिळाला नाही, तर त्याचा थेट परिणाम त्यांच्या शिक्षणावर होतो. म्हणून मंजूर निधी केवळ कागदावर न राहता पात्र विद्यार्थ्यांपर्यंत वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने पोहोचणे ही सरकारची खरी कसोटी आहे. परदेशी शिक्षणासाठीच्या सारथी शिष्यवृत्तीमध्ये करण्यात आलेले बदल तर विशेष लक्षवेधी आहेत. विद्यापीठांची फी थेट संबंधित संस्थेला देण्याची तरतूद आणि शिष्यवृत्तीवरील कमाल आर्थिक मर्यादा हटविण्याचा निर्णय गुणवंत विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी निर्माण करू शकतो. परदेशातील उच्च शिक्षणाची फी अत्यंत मोठी असल्याने आर्थिक अडचणींमुळे अनेक विद्यार्थ्यांना आपली स्वप्ने सोडावी लागतात. अशा परिस्थितीत गुणवत्तेला आर्थिक मर्यादेपेक्षा अधिक महत्त्व देणारी व्यवस्था उपयुक्त ठरू शकते. मात्र येथेही गुणवत्ता, पारदर्शकता आणि समान संधी या तीन बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. QS क्रमवारीच्या आधारे विद्यापीठांची निवड करण्याची पद्धत लागू करताना विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक क्षेत्रांचा स्वतंत्रपणे विचार होणे आवश्यक आहे. जागतिक क्रमवारी ही एकमेव गुणवत्ता मोजण्याची पद्धत मानता कामा नये. गरीब किंवा ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रक्रियेतील अडथळ्यांमुळे संधीपासून वंचित राहावे लागू नये, याची काळजी शासनाने घेतली पाहिजे.

## संस्कृत सुभाषित

मद्यपस्य कुत: सत्यं, दया मांसाशिन: कुत:।कामिनश्च
कुतो विद्या, निर्धनस्य कुत: सुखम् ॥

अर्थ : दारूच्या आधीन झालेल्या माणसाला सत्य ठाऊक नसते, मांसाहाराची आवड असणाऱ्याला दया नसते, स्त्रीविषयी आत्यंतिक कामवासना असणाऱ्याला विद्या कुठून मिळणार आणि दरिद्री माणसाला सुख कसे मिळणार?

## गुरु वचन

### भगवद्गीतेत जीवनाचा प्रवाह

भगवद्गीतेत जीवनाचे सत्य दडले असून जीवनात येणाऱ्या अडचणींचे कारण व निवारण दोन्ही गोष्टी सविस्तरपणे सांगण्यात आल्या आहेत म्हणून गीतेचा उपदेश जगभरात प्रसिद्ध आहे व प्रत्येक वर्गास प्रभावित करतो. गीता डॉक्टरप्रमाणे आहे. फरक इतकाच आहे की, डॉक्टर शारिरीक रोगांवर उपचार करतो व गीता मनातील रोग दुर करण्याचा मार्ग दाखवते. ज्याप्रकारे डॉक्टर रोगीचे रोग निवारण करण्यासह त्याचे कारण सांगतो, त्याप्रकारे जर गीतेचा सखोल अध्ययन केले तर मनातील रोगांचे कारण व निवारण दोन्ही समजतात. गीता मनाचे रोग दुर करण्याचे सशक्त माध्यम आहे. गीता ज्ञानामुळे मानवी जीवनातून मोह सहज दुर केला जाऊ शकतो. जीवनात दु:खाचे सर्वात मोठे कारण मोहच आहे. जर जीवनाला यशस्वी बनवायचे असेल व मोहातून मुक्त व्हायचे असेल तर गीतेच्या शरणात जावे लागेल. गीतेतून ज्ञान मिळवून मानव मोक्ष मिळवू शकतो. गीतेचे ज्ञान मानवाला त्याची आत्मा अमर होण्याच्या विषयात बोध करुन आपले कर्तव्य कर्म पूर्ण निष्ठेने करण्यास प्रेरित करतो. ईश्वराने मानवी देह फक्त भोगासाठी प्रदान केला नसून याचा उपयोग मोक्ष प्राप्तीसाठी केला पाहिजे. यासाठी आपण भजन, सत्संग, समाजसेवा व लोककल्याणाचे कार्य केले पाहिजे.

साधु व नदी कधीच एका ठिकाणी थांबत नाही व सतत पुढे जात विविध ठिकाणी लोकांच्या हृदयात आपले ज्ञान व भक्तीच्या प्रभावाने त्यांना आनंदित करतो. प्रत्येक मानवास पुर्ण श्रद्धा व निष्ठेने उपकारासाठी तयार राहिले पाहिजे. आपल्या ज्ञानाने जग प्रकाशित करण्याचा प्रयत्न करत राहिले पाहिजे, वास्तवात हाच मानव धर्म आहे.

## उपदेशकथा

एका विहिरीजवळ एक मुलगा खेळत होता. वाटेने एक चोर जात होता. चोराला पाहिल्याबरोबर मुलगा रडायला लागला. तेव्हा चोराने त्याला विचारले, काय रे? काय झाल? तो मुलगा म्हणाला, आई मला आता मारणार. कारण माझा चांदीचा गडू या विहिरीत पडला.

काही काळजी करू नकोस. मी तुझा गडू काढून देतो असे म्हणून चोराने कपडे काढले आणि तो विहिरीत उतरला. आपल्याला सहज चांदीचा गडू पचवता येईल. या विचाराने तो खुश झाला होता. विहिरीचा तळ गाठून चोराने गडू शोधण्याचा प्रयत्न केला. पण त्याला तो गडू सापडलाच नाही. कारण गडू विहिरीत पडलाच नव्हता. अखेर निराश होऊन तो कुडकुडत वर आला. पाहतो तो काय तो मुलगा गायब आणि सगळे गावकरी हजर अशा तऱ्हेने चोर सापडला.

कथा उपदेश : तल्लख बुद्धीचा वापर केल्याने धोका टळतो.

## पंचांग

पंचांग
८ सप्टेंबर २०२६
मंगळवार
विक्रम संवत्– २०८२
आषाढ शके
संवत्– १९४८
संवत्सर –पराभवनाम
अयन– दक्षिणयन
मास– आषाढ
ऋतु– सौर शरद
कृष्ण पक्ष
तिथि:द्वादशी १४:४३:१३
नक्षत्र:पुष्य १६:३९:१३
योग:परिध २४:३९:५५+
करण:तैतिल १४:४३:१३
करण:गर २५:३५:४०+

सूर्य:सिंह
चन्द्र:कर्क
हिजरी सन् – १४४८
मुस्लिम मास – रबिलावल
तारीख – २५
विशेष
भौमप्रदोष
पर्युषण पर्वारंभ
(पंचमी पक्ष) – जै
शिवस्वरूपानंद स्वामी
पाठक पुण्यतिथी –
कारंजा (वाशिम)
संत सेना महाराज
पुण्यतिथी
मंगळागौरी पूजन

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०६३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | | 3 | | | 7 | | 5 |
| 5 | 6 | | | 1 | | 2 | | 9 |
| | | | | | | | 6 | |
| 4 | 3 | | | 2 | | | | 7 |
| 1 | | 8 | 9 | | 4 | 5 | | 6 |
| 6 | | | | 8 | | | 3 | 1 |
| | 8 | | | | | | | |
| 3 | | 7 | | 4 | | | 1 | 2 |
| 9 | | 4 | | | 3 | | 5 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०६२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 1 | 6 | 5 | 8 | 4 | 7 | 9 | 3 |
| 8 | 5 | 4 | 7 | 3 | 9 | 2 | 6 | 1 |
| 7 | 3 | 9 | 1 | 2 | 6 | 4 | 5 | 8 |
| 3 | 4 | 5 | 9 | 1 | 7 | 6 | 8 | 2 |
| 1 | 9 | 8 | 4 | 6 | 2 | 3 | 7 | 5 |
| 6 | 2 | 7 | 3 | 5 | 8 | 9 | 1 | 4 |
| 5 | 8 | 2 | 6 | 7 | 3 | 1 | 4 | 9 |
| 4 | 7 | 3 | 8 | 9 | 1 | 5 | 2 | 6 |
| 9 | 6 | 1 | 2 | 4 | 5 | 8 | 3 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- इ.स. ७० – रोमन सैन्याने जेरुसलेम लुटून सर्व ज्यूंना शहराबाहेर काढले.
- २००६ – दक्षिण अफगाणिस्तानातील कंधार प्रांतात नाटो सैनिकांच्या हवाई आणि जमीनी हल्ल्यात २१ चरमपंथी ठार झाले.
- २००६ – न्यूयॉर्कमध्ये वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या जागी बनविण्यात येणाऱ्या आकाशाला भिडणाऱ्या उंच इमारतींच्या प्रतिकृतींचे उद्घाटन करण्यात आले.
- २००६ – उत्तर–पश्चिम आणि मध्य मैक्सिकोच्या डोंगराळ ग्रामीण भागात मुसळधार पावसानंतर माती ढासळल्याने १६ जणांचा मृत्यू झाला.

### आंतरराष्ट्रीय

- १८५७ – स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतल्यामुळे रंगो बापूजी गुप्ते यांना, त्यांच्या मुलाला व आणखी अठराजणांना सातारा येथे फाशी देण्यात आले.
- १८९७ – टिळकांवरच्या राजद्रोहाच्या पहिल्या खटल्यास प्रारंभ.
- १९१० – शेगावच्या गजानन महाराजांनी समाधी घेतली.
- १९२० – काँग्रेस अधिवेशनामध्ये गांधीजींनी मांडलेल्या असहकारविषयक ठरावास मंजुरी देण्यात आली.

### जन्म

- १२७९ – संत मुक्ताबाई.
- १४७४ – लोदोव्हिको आरिओस्तो, इटालियन महाकवी.
- १९३३ – आशा भोसले, सुप्रसिद्ध गायिका.

### निधन

- १९६० – खासदार फिरोझ गांधी.
- १९८२ – शेख अब्दुल्ला.
- १९९७ – कमला सोहनी, आहारतज्ज्ञ.
- २००३ – गुलाबराय रामचंद, भारताचे माजी कर्णधार.

आंतरराष्ट्रीय साक्षरतादिन

## : SMS :

Santa-Banta:
Santa: Yaar main gym ja raha hu.
Banta: Kyu?
Santa: Doctor ne khoon me cholesterol bataya hai.
Banta: To?
Santa: Soch raha hu daud ke bahar nikal du!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.८ | २२.३ |
| अहमदनगर | ३१.९ | २२ |
| अकोला | ३५.७ | २४.७ |
| अमरावती | ३४.८ | २४.६ |
| बीड | ३८.७ | २७.१ |
| भंडारा | ३६ | २५.४ |
| बुलढाणा | ३२.६ | २५.२ |
| चंद्रपूर | ३७.९ | २७.४ |
| चेन्नई | ४३.९ | ३२.७ |
| नवी दिल्ली | ३२.९ | २६.२ |
| धुळे | ३५.४ | २४.३ |
| गोंदिया | ३५.३ | २५.४ |
| जळगाव | ३४.२ | २४.३ |
| कोल्हापूर | २९.९ | २२.२ |
| लातूर | ३३ | २२.४ |
| मुंबई | ३२.३ | २७.२ |
| नागपूर | ३५.७ | २५.४ |
| नांदेड | ३५.१ | २४.८ |
| नंदूरबार | ३१.२ | २४ |
| नाशिक | ३१ | २२.३ |
| पुणे | २६.८ | २१.७ |
| पंढरपूर | ३४.३ | २३.१ |
| सातारा | ३१.३ | २०.९ |
| सांगली | ३२.८ | २२.२ |
| सोलापूर | ३४.४ | २३.६ |
| वर्धा | ३६.१ | २५.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व मित्र किंवा सहकारी यांच्यावर जास्त विश्वास करू नका. मान प्रतीष्ठा कमी होईल.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा :पूर्व वैवाहिक जीवनात घडणाऱ्या कुरबुरीचे परिणाम संततीवर होते असतात याचा विचार करणे महत्त्वाचे ठरेल.

**मिथुन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व अचानक निर्माण झालेल्या कामामुळे मानसिक त्रास वाढेल.

**कर्क :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व आर्थिक व्यवहार अगदी बेसावध अवस्थेत करू नका. एखादी चूक फटका देणारी ठरेल.

**सिंह :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:दक्षिण महत्त्वाचे प्रश्न रेंगाळतील. मुलाविषयीचे प्रश्नाच्या बाबतीत बारकाईने लक्ष घालावे लागेल.

**कन्या :** शुभ रंग :जांभळा, शुभ दिशा : उत्तर स्थावर मालमत्तेसंबंधी अडचणी दूर होण्याची शक्यता आहे.

**तुळ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:उत्तर वेळेवर कामे होतील. आर्थिक लाभ झाल्याने आनंद होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींना आपले आसन बळकट करता येईल.


**धनु :** शुभ रंग :केसरी, शुभ दिशा :पश्चिम बौद्धीक वर्गात सन्मान मिळेल. अपुरे राहीलेले कामे मार्गी लागतील. संताना संबंधी अधिक काळजी घ्याल.

**मकर :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पश्चिम कोणताही मुद्दा प्रतिष्ठेपर्यंत जाणार नाही याची काळजी घ्या. युवकांनी कोठेही बेसावध राहू नका.

**कुंभ :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम एखादी मोठी गुंतवणूक आगामी काळासाठी फायद्याची ठरणार आहे.

**मीन :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा:पूर्व सरकारी कामांना प्राधान्य द्या. व्यसन प्रलोभन यापासून आवर्जून दर रहा. युवकांनी प्रलोभने टाळा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०६३



### आडवे शब्द

१. उपद्रवी बडबड (ला.)
५. गोष्ट
७. गणितातील अधिक क्रिया
९. देवाचे देहधारी रूप
११.वेदनेने ओरडणे
१२. मर्कट
१४. वाळवंट
१६. शेंगेवरील आवरण
१७. गूढ, अवघड
१९. अर्थसंकल्प
२०. श्रीकृष्णाचे लहानपणाचे राहण्याचे ठिकाण
२२. जेव्हा
२४. फरक, तफावत
२५. बैलगाडीचा एक प्रकार
२६. वन, रान
२७. पोट
२८. शेगावचा प्रसिद्ध पदार्थ
३०. झीज, नुकसान
३१. कुटुंबकबिला
३२. धपाटा
३३. पाडाव, पडणे
३५. पुन्हा
३७. विहीर
३८. फेरफटका
४०. चौथा भाग
४२. तर्क, अंदाज
४४. जहाजांचा मुक्काम
४६. जास्तीचे
४७. रेश्मी जाडसर कापडप्रकार
४९. सुकामेव्यातील काळी द्राक्षे
५१. पळसाचा डिंक
५२. बंदूक (इंग्रजी)
५२अ. बिल्ला
५४. तापापूर्वीचे शहारे
५७. क्वचित
५८. कडक स्वभावाची स्त्री
६१. हात
६२. मवाळ धोरण
६५. सोने
६६. समुद्रकिनारा
६८. बाण
७०. च्या बद्दल
७२. व्रत
७५. अग्नी, ज्वाला
७६. संध्याकाळ
७८. तत्काळ, जागच्या जागी
७९. निश्चयी, दृढ मनाचा
८०. कटी

### उभे शब्द

१. लेखनात आढळणारा पक्ष्याचा पाय
२. वळसा– शिस्त
३. गेरु
४. सुबक (अक्षर)
६. काळजी
७. न घाबरणारा
८. तीव्र रेचक
९. गबाळ
१०. सूर्याचे एक नाव
१३. वटवट
१५. कपडालत्ता
१८. मनोहरी दृश्य
१९. वर–वधूमधील पडदा
२१. मुद्दाम काढलेली खोडी
२३. धर्मार्थ देणे
२४. आत (हिंदी)
२५. प्रयत्न
२६. दुष्ट बेत, कपट
२९. पद्धत
३४. पुरुष
३६. समशीतोष्ण
३७. विश्रांती
३९. स्क्रू ड्रायव्हरला मराठी शब्द
४०. स्वामी स्वरुपानंदाच्या समाधीचे गाव
४१. देवाण घेवाण
४३. उजाड
४४. दुर्दशा
४५. टपाल
४६. जागृती
४८. बेचव
४८अ. दात
५०. तोटा
५३. व्यायाम
५५. पवित्र कुराणातील वचन
५६. प्यारेलाल यांच्या जोडीचे संगीतकार
५९. अनेकांकडून कर्ज घेतलेला
६०. एक पाताळ
६१. हिंदीत कर्म
६३. आवाज, गोंगाट
६४. परमेश्वर
६७. आवरणाचा छोटा तुकडा
६९. धोबी
७१. ताकद
७३. स्वच्छ
७४. स्त्रियांचा दंडातील दागिना
७६. भोळा
७७. धातूचा धागा, कलाबतू

### जम्बो शब्दकोडे क्र. १०६२ चे उत्तर

आडवे उत्तर : १.पारावार ४.ममता ६.सवडीनुसार १०.राज ११.कपाल १२.वसाहत १४.साग १६.कुसुम १८.वरदान २०.नवसाचा २२.सुमार २३.पटकन २४.अदा २५.नवागत २७.घर २८.सर ३०.रस ३२.चारा ३३.गाव ३४.संपादकीय ३६.पालवी ३८.परतपरत ३९.कोट ४०.परवा ४१.समर्थ ४२.नराधम ४४.दवा ४५.तरुण ४८.लव ५०.नरमाई ५१.अजगर ५३.मासला ५५.नांगी ५६.भाव ५७.पाव ५८.जवळ ६०.बगीचा ६२.यमराज ६४.रथ ६६.रवरव ६८.जनगणमन ७१.टका ७३.नाग ७४.अथक ७६.नाखवा ७७.कालहरण ७९.रणगाडा ८०.ललना ८१.कबर

उभे उत्तर : १.पारा २.राजकुमार ३.रकम ४.मळवट ५.तावदान ६.सह ७.वतनदार ८.नुकसान ९.रसा १३.सान १५.गवत १७.सुर १९.रकमपात २१.चावाचावी २२.सुघड २३.पर २६.गरा २८.सवत २९.बाकी ३१.सपाटून ३३.गारवा ३४.संरक्षण ३५.यथार्थ ३७.पोट ३८.परवानगी ३९.कोमल ४०.पद ४१.सरोज ४३.राजस ४५.तमासगीर ४६.रूई ४९.वर्दळ ५१.अवयव ५२.गजराज ५३.मावळण ५४.लाज ५५.नांगर ५९.वसा ६१.चावट ६३.जनगणना ६५.थरथर ६७.रकाना ६९.मतलब ७०.संगणक ७२.सवाल ७३.नार ७५.कण ७७.काक ७८.हर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे




### नवीन कामगार कायद्याबाबत कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम

पुणे : दैनिक संध्या

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे आणि Aajivika Bureau यांच्या संयुक्त विद्यमाने कामगारांसाठी नवीन कामगार संहितेबाबत कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू एस. शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव रेवती आर. देशपांडे तसेच संयुक्त दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग एस. पी. नार्वेकर उपस्थित होत्या. यावेळी एस. पी. नार्वेकर यांनी नवीन कामगार संहितेतील तरतुदी, कामगारांचे हक्क व कायदेशीर संरक्षण याबाबत मार्गदर्शन केले. सचिव रेवती आर. देशपांडे यांनी कामगारांसाठी विधी सेवा प्राधिकरणामार्फत उपलब्ध मोफत कायदेविषयक सेवा, मार्गदर्शन व विविध शासकीय योजनांची माहिती दिली. कार्यक्रमास कामगार व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध प्रश्न विचारून शंकांचे निरसन करून घेतले. कामगारांना त्यांच्या कायदेशीर हक्कांबाबत जागरूक करणे व विधी सेवा सुविधांपर्यंत त्यांचा सुलभ प्रवेश सुनिश्चित करणे, हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

### परराज्य शिष्यवृत्तीसाठी अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करावेत

पुणे : दैनिक संध्या

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असलेल्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परराज्यातील मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतल्यास परराज्य शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी विद्यार्थी ज्या जिल्ह्याचा रहिवासी आहे, त्या जिल्ह्यातील सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. परराज्यात शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीतील पात्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये, यासाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करण्याचे आवाहन विशाल लोंढे, सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी केले आहे.

### विद्यार्थ्यांनी केंद्र शासनाचा ६० टक्के हिस्सा तत्काळ महाविद्यालयात जमा करावा

पुणे : दैनिक संध्या

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रकमेचे वितरण दोन हप्त्यांमध्ये करण्यात येते. यामध्ये ४० टक्के हिस्सा राज्य शासनामार्फत महाविद्यालयास, तर ६० टक्के हिस्सा केंद्र शासनामार्फत विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यात येतो. शिष्यवृत्तीचा केंद्र शासनाचा ६० टक्के हिस्सा विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा झाल्यानंतर, विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असलेला निर्वाह भत्ता स्वतःजवळ ठेवून, महाविद्यालयास देय असलेली उर्वरित रक्कम बँक खात्यात जमा झाल्यापासून ७ दिवसांच्या आत संबंधित महाविद्यालयात जमा करणे अनिवार्य आहे. तथापि, काही विद्यार्थी महाविद्यालयास देय असलेली रक्कम जमा करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांनी शासनाच्या निर्देशांचे पालन करून शिष्यवृत्तीच्या रकमेपैकी महाविद्यालयास देय असलेली रक्कम विहित मुदतीत जमा करावी, असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण विशाल लोंढे यांनी केले आहे.

### बनावट लिंक व APK पासून सावध राहण्याचे परिवहन विभागाचे आवाहन

पुणे : दैनिक संध्या

परिवहन विभागाच्या नावाने ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी, ई-चलन आदी सेवांसाठी बनावट संकेतस्थळे, अनधिकृत APK ॲप्स तसेच SMS/WhatsApp द्वारे पाठविल्या जाणाऱ्या खोट्या लिंकच्या माध्यमातून नागरिकांची आर्थिक फसवणूक व वैयक्तिक माहितीची चोरी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे वाहन चालक व मालकांनी केवळ परिवहन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळांचाच वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. वाहन नोंदणीसाठी VAHAN (https://vahan.parivahan.gov.in, ड्रायव्हिंग लायसन्ससाठी SARATHI (https://sarathi.parivahan.gov.in, परिवहन सेवांसाठी Parivahan (https://www.parivahan.gov.in आणि ई-चलानसाठी NextGen eChallan (https://echallan.parivahan.nic.in/challan या अधिकृत संकेतस्थळांचा वापर करावा. RTO कार्यालय किंवा परिवहन विभागाकडून WhatsApp द्वारे पेमेंट लिंक पाठविली जात नाही. "दंड त्वरित भरा", "DL सस्पेंड होणार आहे" अशा धमकीवजा संदेशांतील लिंकवर क्लिक करू नये. RTO Services.apk, Parivahan_Update.apk, eChalan Pay.apk यांसारखे अनधिकृत APK डाउनलोड करू नयेत. संशयास्पद संदेश किंवा लिंक प्राप्त झाल्यास नॅशलल सायबर क्राईम पोर्टल https://www.cybercrime.gov.in वर तक्रार करावी किंवा सायबर फसवणूक हेल्पलाइन १९३० वर संपर्क साधावा. तसेच जवळच्या जिल्हा सायबर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी.

### जिल्ह्यात १२ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालत

पुणे : दैनिक संध्या

न्यायालयातील तडजोडीस पात्र प्रलंबित तसेच दाखलपूर्व प्रकरणे दोन्ही पक्षकारांच्या सहमतीने निकाली काढण्यासाठी जिल्ह्यात १२ सप्टेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. पक्षकार, अधिवक्ता आणि नागरिकांनी अधिकाधिक प्रकरणे लोकअदालतीत ठेवून तडजोडीचा मार्ग अवलंबावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू श. शेडे यांनी केले आहे. जिल्हा मुख्यालयासह सर्व तालुका न्यायालयांमध्ये लोकअदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे. दिवाणी व तडजोडीस पात्र फौजदारी प्रकरणे, एन.आय. ॲक्ट, भूसंपादन, कौटुंबिक, मोटार वाहन अपघात दावा, बँक, वीज देयक, ग्राहक तक्रार निवारण, ग्रामपंचायत, नगरपरिषद व महानगरपालिका पाणीपट्टी तसेच दाखलपूर्व तडजोडीची प्रकरणे लोकअदालतीत तडजोडीसाठी ठेवता येणार आहेत. लोकअदालतीत प्रकरणे निकाली निघाल्यास नियमानुसार कोर्ट फी परत मिळू शकते. तसेच जलद निकाल, वेळ व पैशांची बचत आणि परस्पर संमतीने तडजोड झाल्याने आपसातील कटुता कमी होण्यास मदत होते. लोकअदालतीच्या निकालावर अपील करता येत नाही. अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे तसेच संबंधित तालुका विधी सेवा समिती व दिवाणी फौजदारी न्यायालयाशी संपर्क साधावा.



# पुण्यात रंगणार 'ग्लोबल गणेश वाट'

■ पुणे (दै. संध्या)

■ ८ देशांतील सहभागी जोडले जाणार गणपती संस्कृतीशी

■ गणेश चतुर्थीच्या वीकेंडला जे. एम. रोड परिसरात सांस्कृतिक खजिना शोध स्पर्धा

पुण्याच्या समृद्ध गणपती परंपरेचा इतिहास, संस्कृती आणि वारसा जगभरातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने संस्कृती तर्फे भारतातील पहिली गणपती सांस्कृतिक खजिना शोध स्पर्धा 'ग्लोबल गणेश वाट' आयोजित करण्यात आली आहे. गणेश चतुर्थीच्या वीकेंडला, १९ व २० सप्टेंबर रोजी पुण्यात ही अनोखी स्पर्धा रंगणार आहे. अशी माहिती संस्कृती संस्थेचे निसर्ग उदेशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. या स्पर्धेत आठ देशांतील सहभागी एकाच वेळी पुण्याच्या गणपती संस्कृतीशी जोडले जाणार आहेत.

कुटुंबे, विद्यार्थी आणि नागरिकांना श्रद्धा, इतिहास व परंपरेवर आधारित विविध सांस्कृतिक सुगावे उलगडत जे. एम. रोडच्या सुमारे पाच किलोमीटर परिसरात खजिना शोधावा लागणार आहे. विशेष म्हणजे स्पर्धेची सुरुवात आणि सांगता जे. एम. रोडवरच होणार आहे.

'ग्लोबल गणेश वाट'चे प्रमुख आकर्षण म्हणजे पुणे ते फुकेत असा निर्माण होणारा सांस्कृतिक दुवा. स्पर्धेतील विजेत्यांना थायलंडमधील फुकेत येथील श्रीमंत गणपती बाप्पा देवळाई येथे कुटुंबासह सहलीची संधी मिळणार आहे. पुण्यातील दगडूशेठ गणपती मंदिर आणि फुकेतमधील गणपती प्रती दगडूशेठ या दोन गणपती परंपरांना जोडण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला आहे. हा उपक्रम फुकेत येथील श्रीमंत गणपती बाप्पा देवळाईचे समन्वयक चेतन लोढा यांच्या सक्रिय सहकार्याने राबविण्यात येत आहे. 'ग्लोबल गणेश वाट'चे Pune NRI Edition देखील यंदा सादर करण्यात आले आहे. सिंगापूर, यूके, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, कतार, मलेशिया आणि थायलंड येथील पुणेकर NRI कुटुंबे WhatsAppच्या माध्यमातून पुण्यातील आपल्या कुटुंबीयांना रिअल टाइममध्ये मार्गदर्शन करणार आहेत. यामुळे जगभरातील पुणेकरांना गणेशोत्सवाशी जोडण्याबरोबरच एक जागतिक लीडरबोर्ड तयार होणार आहे. या उपक्रमासाठी निसर्गशाळा कॅम्पसाइट भागीदार, मावळा बोर्डगेम्स भागीदार असून, डीसकव्हर पुणेचे माधुर बर्वे खजिना शोधातील सुगाव्यांची रचना करीत आहेत. SansCreatee ही पुण्यातील अनुभवात्मक खजिना शोध कंपनी असून संस्थेने भारतासह इंडोनेशिया, थायलंड, हाँगकाँग, जर्मनी आणि अमेरिका या देशांमध्ये ३२ हून अधिक खजिना शोध स्पर्धांचे आयोजन केले आहे.

# मध्यस्थी प्रक्रियेत पक्षकारांचे म्हणणे समजून घेणे आणि संवाद महत्त्वाचा

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू ए. एस. शेंडे

■ पुणे (दै. संध्या)

न्यायप्रक्रियेकडे केवळ विजय किंवा पराभवाच्या दृष्टिकोनातून न पाहता पक्षकारांचे म्हणणे समजून घेणे, त्यांच्या भावना जाणून घेणे आणि संवादाच्या माध्यमातून मतभेद दूर करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. मध्यस्थी प्रक्रियेत संवाद, समजूतदारपणा आणि प्रेमळपणाला विशेष महत्त्व आहे, असे प्रतिपादन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती अंजू ए. एस. शेंडे यांनी केले.

शिवाजीनगर जिल्हा न्यायालयातील अशोका हॉल येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे आणि पुणे बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मध्यस्थी जनजागृती कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमास सेवानिवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. शिरीषकुमार हाडे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती रेवती आर. देशपांडे तसेच पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. काळूराम बबन भुजबळ उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना श्रीमती शेंडे म्हणाल्या की, मध्यस्थी प्रक्रियेत पक्षकारांचे म्हणणे आणि त्यांच्या भावनांचा विचार करून संवादातून तोडगा काढण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

> पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. काळूराम बबन भुजबळ यांनीही सर्व वकिलांनी मध्यस्थी प्रक्रियेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवून पक्षकारांना त्वरित व समाधानकारक न्याय मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

मध्यस्थी प्रक्रियेसाठी संभाषण चातुर्य आवश्यक असून संतुलन राखणे गरजेचे आहे. मध्यस्थाने स्वतःची निर्णायक भूमिका घेऊ नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सेवानिवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. शिरीषकुमार हाडे यांनी मध्यस्थी प्रक्रियेची कार्यपद्धती, मध्यस्थाची भूमिका आणि मध्यस्थी प्रक्रियेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती रेवती आर. देशपांडे यांनी मध्यस्थी प्रक्रिया राबविताना येणाऱ्या विविध अडचणी तसेच त्या दूर करण्यासाठी आवश्यक बाबींबाबत मार्गदर्शन केले. तसेच १२ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन केले.

जनगणना २०२७ साठी ४० बाबींवर

# माहिती संकलित करण्याचे निर्देश

■ पुणे (दै. संध्या)

भारताची जनगणना २०२७ च्या अनुषंगाने विहित कुटुंब पत्रकाद्वारे माहिती संकलित करण्यासाठी केंद्र शासनाने जनगणना अधिकाऱ्यांना विविध बाबींवरील माहिती संकलित करण्याचे निर्देश दिले आहेत. जनगणना अधिनियम, १९४८ च्या कलम ८ मधील उपकलम (१) अन्वये हे निर्देश जारी करण्यात आले आहेत. जनगणना अधिकारी नियुक्त करण्यात आलेल्या स्थानिक क्षेत्राच्या हद्दीत राहणाऱ्या सर्व व्यक्तींना निर्धारित कुटुंब पत्रकातील प्रश्न विचारून माहिती संकलित करतील. यामध्ये व्यक्तीचे नाव, कुटुंबप्रमुखाशी नाते, लिंग, जन्मतारीख व वय, वैवाहिक स्थिती, विवाहावेळीचे वय, पती किंवा पत्नीचे नाव, घोषित राष्ट्रीयत्व, धर्म, अनुसूचित जाती/जमाती व जात यांचा समावेश आहे. तसेच वडील व आईचा तपशील, दिव्यांगत्व, मातृभाषा व इतर अवगत भाषा, साक्षरता व डिजिटल साक्षरता, शैक्षणिक स्थिती, उच्चतम शैक्षणिक स्तर व शाखा/विषय, मागील वर्षातील कामाची स्थिती, आर्थिक कार्याची वर्गवारी, व्यवसाय, उद्योग-व्यापार-सेवेचे स्वरूप आणि कामगारांचा प्रवर्ग याबाबतही माहिती घेतली जाणार आहे. अंशकालीन, निम-अंशकालीन तसेच काम न करणाऱ्या व्यक्तींसाठी बिनआर्थिक कार्य आणि

> सध्या विवाहित, विधवा, घटस्फोटित आणि विभक्त महिलांसाठी सध्या हयात असलेल्या अपत्यांची संख्या व जीवित जन्म झालेल्या अपत्यांची संख्या, तसेच सध्या विवाहित महिलांसाठी मागील वर्षभरात जीवित जन्मलेल्या अपत्यांची संख्या विचारण्यात येणार आहे.

कामाच्या शोधात किंवा कामासाठी उपलब्ध असल्याबाबतची माहिती संकलित केली जाईल. याशिवाय कामाच्या ठिकाणापर्यंतचा प्रवास, जन्मठिकाण, पूर्वीचे निवासस्थान, स्थलांतराचे कारण, शेवटच्या स्थलांतरानंतर गावात किंवा शहरात वास्तव्याचा कालावधी आणि कायमस्वरूपी निवासाचा पत्ता यांचीही नोंद केली जाणार आहे. जनगणना माहिती संकलनात कोविड-१९ लसीकरणाचे ठिकाण, बँक खात्यांची एकूण संख्या, उपलब्ध असल्यास मोबाइल क्रमांक, आधार क्रमांक, मतदार ओळखपत्र क्रमांक, भारतीय पासपोर्टधारक असल्यास पासपोर्ट क्रमांक आणि वाहनचालक परवान्याची उपलब्धता याबाबतची माहितीही समाविष्ट करण्यात आली आहे.

# 'ग्लोबल एज्युकेशन फेअर २०२६'चे आयोजन

६० हून अधिक परदेशी विद्यापीठांशी पुण्यातील विद्यार्थ्यांना थेट संवादाची विनामूल्य संधी

■ पुणे (दै. संध्या)

परदेशात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या पुण्यातील विद्यार्थ्यांना ६० हून अधिक आंतरराष्ट्रीय विद्यापीठांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधण्याची विनामूल्य संधी मिळणार आहे. स्टडी स्मार्टतर्फे १२ सप्टेंबर रोजी रॉयल कनॉट, बोट क्लब येथे 'ग्लोबल एज्युकेशन फेअर २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत होणाऱ्या या मेळाव्यासाठी प्रवेश विनामूल्य आहे; अशी माहिती स्टडी स्मार्टचे व्यवस्थापकीय संचालक चेतन जैन यांनी पत्रकार परिषदेत दिली. अधिक माहिती देताना जैन म्हणाले, "आंतरराष्ट्रीय शिक्षणाच्या अनेक संधी विद्यार्थ्यांसमोर आहेत. मात्र, योग्य निर्णय घेण्यासाठी अचूक माहिती महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांना आणि पालकांना विद्यापीठांशी थेट संवाद साधता यावा आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळावे, हा मेळाव्याचा उद्देश आहे." या मेळाव्यात यूके, अमेरिका, आयर्लंड, जर्मनी, दुबई, ऑस्ट्रेलिया तसेच युरोपमधील विविध विद्यापीठांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. विद्यार्थ्यांना विद्यापीठ व अभ्यासक्रम निवड, प्रवेश




प्रक्रिया, शिष्यवृत्ती, आर्थिक मदत तसेच परदेशातील शिक्षणानंतरच्या करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन मिळणार आहे.

परदेशी शिक्षणासाठी वाढती पसंती असली, तरी योग्य विद्यापीठ आणि अभ्यासक्रमाची निवड, प्रवेशाच्या अटी, शिष्यवृत्ती मिळविण्याची प्रक्रिया तसेच शिक्षणासाठी आर्थिक नियोजन ही विद्यार्थ्यांसमोरील प्रमुख आव्हाने आहेत. या पार्श्वभूमीवर मेळाव्यात तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि विद्यापीठांच्या प्रतिनिधींशी थेट संवादाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मेळाव्यात विद्यापीठ निवड, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती, आर्थिक मदत, IELTS मधील सूट, स्पॉट ॲडमिशनच्या संधी, शिक्षणानंतरच्या कामाच्या संधी आणि आंतरराष्ट्रीय करिअर यावर चर्चासत्रे व कार्यशाळा होणार आहेत. स्टडी स्मार्टचे समुपदेशक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पार्श्वभूमी आणि करिअरच्या उद्दिष्टांनुसार योग्य अभ्यासक्रम, विद्यापीठ व शिक्षणाचे ठिकाण निवडण्यासाठी वैयक्तिक मार्गदर्शन करणार आहेत.

> याशिवाय शिक्षण कर्ज, विद्यार्थी निवास, परकीय चलन, प्रवास सहाय्य आणि करिअर समुपदेशनासाठी स्वतंत्र मार्गदर्शन कक्ष असणार आहेत. जपानमधील उच्च शिक्षण व करिअरच्या संधींची माहिती देण्यासाठी भारतातील जपानच्या दूतावासाच्या पाठबळाने कार्यरत MOSAI या संस्थेचा विशेष सहभाग असणार आहे. पुण्यातील अभ्यासासाठी परदेशगमन मेळाव्यात MOSAIचा हा पहिलाच सहभाग असल्याचे जैन यांनी सांगितले. विद्यार्थी आणि पालकांसाठी मेळावा खुला असून नोंदणी विनामूल्य आहे. इच्छुकांना ऑनलाइन नोंदणी करता येईल. अधिक माहितीसाठी ९८२१५ ७८९८८ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.

## मध्यस्थी प्रक्रियेत पक्षकारांचे म्हणणे समजून घेणे आणि संवाद महत्त्वाचा

■ पुणे (दै. संध्या)

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू ए. एस. शेंडे

न्यायप्रक्रियेकडे केवळ विजय किंवा पराभवाच्या दृष्टिकोनातून न पाहता पक्षकारांचे म्हणणे समजून घेणे, त्यांच्या भावना जाणून घेणे आणि संवादाच्या माध्यमातून मतभेद दूर करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. मध्यस्थी प्रक्रियेत संवाद, समजूतदारपणा आणि प्रेमळपणाला विशेष महत्त्व आहे, असे प्रतिपादन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती अंजू ए. एस. शेंडे यांनी केले.

शिवाजीनगर जिल्हा न्यायालयातील अशोका हॉल येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे आणि पुणे बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मध्यस्थी जनजागृती कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमास सेवानिवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. शिरीषकुमार हाडे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती रेवती आर. देशपांडे तसेच पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. काळूराम बबन भुजबळ उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना श्रीमती शेंडे म्हणाल्या की, मध्यस्थी प्रक्रियेत पक्षकारांचे म्हणणे आणि त्यांच्या भावनांचा विचार करून संवादातून तोडगा काढण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. मध्यस्थी प्रक्रियेसाठी संभाषण चातुर्य आवश्यक असून संतुलन राखणे गरजेचे आहे. मध्यस्थाने स्वतःची निर्णायक भूमिका घेऊ नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सेवानिवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. शिरीषकुमार हाडे यांनी मध्यस्थी प्रक्रियेची कार्यपद्धती, मध्यस्थाची भूमिका आणि मध्यस्थी प्रक्रियेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती रेवती आर. देशपांडे यांनी मध्यस्थी प्रक्रिया राबविताना येणाऱ्या विविध अडचणी तसेच त्या दूर करण्यासाठी आवश्यक बाबींबाबत मार्गदर्शन केले. तसेच १२ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन केले.

पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. काळूराम बबन भुजबळ यांनीही सर्व वकिलांनी मध्यस्थी प्रक्रियेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवून पक्षकारांना त्वरित व समाधानकारक न्याय मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

# अभिनव लॉ कॉलेजमध्ये अमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रम

■ पुणे (दै. संध्या)



जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे आणि अभिनव एज्युकेशन सोसायटीच्या लॉ कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी अमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रम प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू एस. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव रेवंती आर. देशपांडे तसेच संयुक्त दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग डी. डी. पाटील उपस्थित होत्या. यावेळी डी. डी. पाटील यांनी अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अमली पदार्थांपासून दूर राहून समाजात व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्याचे आवाहन त्यांनी केले.तर रेवंती आर. देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन करत कायद्याचे पालन करून जबाबदार नागरिक म्हणून सकारात्मक भूमिका बजावण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# कर्जमुक्ती योजनेत मच्छिमारांनाही समाविष्ट करा

■ वाशिष्ठी मच्छिमार व्यवसायिक सहकारी संस्थेची शासनाकडे मागणी

■ आ. शेखर निकम यांनी मत्स्य व्यवसाय बंदरे विकास मंत्री ना. नितेश राणे यांना दिले निवेदन

■ पुणे (दै. संध्या)



पारंपरिक मासेमारी व्यवसायावर उदरनिर्वाह करणाऱ्या मच्छिमारांना विविध नैसर्गिक व मानवनिर्मित संकटांमुळे मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांप्रमाणेच मच्छिमारांनाही 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' मध्ये समाविष्ट करून कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी वाशिष्ठी मच्छिमार व्यवसायिक सहकारी संस्था, चिवेली यांच्या वतीने आ. शेखर निकम यांनी मत्स्य व्यवसाय बंदरे विकास मंत्री ना. नितेश राणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी चिपळूण पंचायत समितीचे माजी सदस्य पांडुरंग माळी, वाशिष्ठी मच्छीमार व्यवसायिक सह. संस्था, चिवेली या संस्थेचे चेअरमन प्रभाकर सैतवडेकर, विलास वाजे, गणेश साबळे आदी उपस्थित होते. या निवेदनानुसार समुद्र तसेच खाड्यांमध्ये विविध पद्धतीने पारंपरिक मासेमारी करून मच्छिमार आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मात्र, गेल्या काही काळात मासेमारी व्यवसायासमोर अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. एलईडी मासेमारी, डिझेलच्या पुरवठ्याशी संबंधित अडचणी, नैसर्गिक आपत्ती यांसह खाडी परिसरातील जलप्रदूषण आणि अनधिकृत वाळू उपसा यामुळे मासेमारीवर मोठा परिणाम होत आहे. मासेमारीचे उत्पन्न घटल्याने अनेक मच्छिमार कर्जबाजारी झाले असून, कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. आर्थिक संकटामुळे शेतकऱ्यांप्रमाणेच मच्छिमारांवरही टोकाचे पाऊल उचलण्याची वेळ येऊ शकते, अशी चिंता निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. मच्छिमारांना शेतकरी दर्जा देण्याचा शासनाचा निर्णय स्वागतार्ह असून, त्याच धर्तीवर कर्जमुक्ती योजनेचा लाभही मच्छिमारांना मिळावा, अशी मागणी संस्थेने केली आहे.

# प्रेम, महत्त्वाकांक्षा आणि अव्यक्त भावनांच्या वळणावर

## प्राइम व्हिडिओने 'हार्टबीट्स सीझन २' एमएक्स ओरिजिनलचा ट्रेलर केला प्रदर्शित

■ मुंबई (दै. संध्या)

काही प्रेमकथा परस्परांपेक्षा अगदी वेगळ्या असलेल्या दोन व्यक्तींना एकत्र आणतात, काही वयाचे बंधन झुगारून देतात, तर काही प्रेम आणि जवळपास प्रेमात बदललेल्या नात्यामधील सीमारेषाच पुसून टाकतात. पण आधीच गुंतागुंतीचे असलेल्या नात्यात एखाद्या नव्या व्यक्तीचा प्रवेश झाला तर काय होते? प्राइम व्हिडिओने आज 'हार्टबीट्स सीझन 2' या एमएक्स ओरिजिनलचा ट्रेलर प्रदर्शित केला असून, प्रेक्षकांना पुन्हा एकदा व्हेरिडियन हॉस्पिटलमधील आव्हानांनी भरलेल्या जगात नेण्यात येणार आहे. या सीझनमध्ये नाती अधिक घट्ट होणार आहेत, तणाव आणखी वाढणार आहे आणि सर्वांना हव्याहव्याशा वाटणाऱ्या मेंटॉरशिपमुळे आधीच तणावपूर्ण असलेल्या वातावरणात नव्या संघर्षाची ठिणगी पडणार आहे. तन्मई रस्तोगी दिग्दर्शित, अमोघ रणदिवे आणि गरिमा कुंझरू लिखित तसेच रस्क मीडियाची निर्मिती असलेल्या या २० भागांच्या मेडिकल ड्रामेडीमध्ये हर्ष बेनिवाल आणि शिवांगी जोशी पुन्हा एकदा एकत्र दिसणार आहेत. त्यांच्यासोबत रोहन गुरबक्षानी, युवराज दुआ, नकिया हाजी, अंकित सिवाच आणि अदिती शर्मा यांच्याही भूमिका आहेत. 9 सप्टेंबर 2026पासून 'हार्टबीट्स सीझन 2' केवळ प्राइम व्हिडिओ आणि आता 'एमएक्स प्लेयर बाय प्राइम व्हिडिओ' या नव्या रूपात उपलब्ध असलेल्या एमएक्स प्लेयर अँड्रॉइड ॲपवर मोफत स्ट्रीम होणार आहे. मोबाइल, कनेक्टेड टीव्ही, ॲमेझॉन शॉपिंग ॲप आणि फायर टीव्हीवरही ही सीरिज पाहता येणार आहे. ट्रेलरच्या सुरुवातीला डॉ. अक्षत (हर्ष बेनिवाल) आणि डॉ. सांझ (शिवांगी जोशी) यांच्यातील न सुटलेले मतभेद आणि त्यामुळे निर्माण होणारी गुंतागुंत पाहायला मिळते. त्यानंतर व्हेरिडियन हॉस्पिटलमध्ये




■ ९ सप्टेंबर २०२६ पासून 'हार्टबीट्स सीझन २' केवळ प्राइम व्हिडिओवर मोफत स्ट्रीम होणार

घडणाऱ्या वेगवेगळ्या घटना आणि तेथील व्यक्तींच्या आयुष्यातील अडचणींची झलक दाखवण्यात आली आहे. तरुण डॉक्टर नव्या संधींच्या शोधात असतानाच एका वैद्यकीय घोटाळ्यामुळे ज्या संस्थेवर त्यांनी आपले भविष्य सोपवले आहे, तिची काळी बाजू समोर येण्याचा धोका निर्माण होतो. महत्त्वाकांक्षा आणि वैयक्तिक नाती त्यांना वेगवेगळ्या दिशांना खेचत असताना, या सीझनमध्ये मनातील भावनांची गुंतागुंतही जीवन-मरणाच्या प्रश्नांइतकीच कठीण ठरणार असल्याचे संकेत ट्रेलरमधून मिळतात. सीरिजविषयी प्राइम व्हिडिओ इंडियाचे डायरेक्टर आणि हेड ऑफ एव्हीओडी कंटेंट अमोघ म्हणाले, "प्राइम व्हिडिओवर आम्ही प्रेक्षकांसाठी नव्या आणि मनोरंजक दृष्टिकोनातून कथा सादर करण्यावर विश्वास ठेवतो. 'हार्टबीट्स'चे वेगळेपण नेहमीच डॉक्टरांच्या व्हाइट कोट्समागील त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात दडलेले आहे. हॉस्पिटलमधील तणावपूर्ण आयुष्य आणि तरुण वयातील भावना, नातेसंबंध व अनिश्चितता यांची सांगड या सीरिजमध्ये घालण्यात आली आहे. 'सीझन 2' हे जग आणखी गुंतागुंतीचे आणि अनपेक्षित बनते. परिचित व्यक्तिरेखा नव्या प्रकारे विकसित होताना दिसतात आणि त्यांच्यातील नात्यांची नवी समीकरणेही समोर येतात."

डॉ. अक्षतची भूमिका पुन्हा साकारण्याविषयी हर्ष बेनिवाल म्हणाला, "अक्षत नेहमीच मनाचा कौल ऐकून निर्णय घेणारा आहे. पण या सीझनमध्ये त्याच्या या स्वभावाची खऱ्या अर्थाने परीक्षा होणार आहे. यावेळी त्याच्यासाठी बरेच काही पणाला लागले आहे. वरवर दिसणाऱ्या घटनांमागे त्याच्या मनात सुरू असलेले संघर्ष समजून घेणे आणि ते भूमिकेतून मांडणे मला सर्वाधिक आवडले. त्याचा प्रवास केवळ त्याच्यासोबत काय घडते एवढ्यापुरता मर्यादित नाही. या अनुभवांमुळे स्वतःकडे, आपल्या जवळच्या माणसांकडे आणि आपण घेत असलेल्या निर्णयांकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन कसा बदलतो, हेही या प्रवासात पाहायला मिळते. 'हार्टबीट्स'मध्ये परतताना पुन्हा आपल्या परिचित जगात आल्यासारखे वाटले. मात्र सीझन 2मध्ये अक्षतच्या व्यक्तिरेखेचे यापूर्वी न पाहिलेले पैलू निश्चितच समोर येणार आहेत."

# राजीव तलरेजा यांची मार्गदर्शक म्हणून नियुक्ती

■ ASUS EXPERT SERIESच्या 'BUILT FOR WORRY-FREE BUSINESS' या वचनाला मिळणार नवे बळ

■ MSME समुदायाच्या गरजा तंत्रज्ञानाच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न

■ पुणे (दै. संध्या)

ASUS इंडियाने MSME क्षेत्रातील तज्ज्ञ आणि Quantum Leapचे संस्थापक राजीव तलरेजा यांची MSME विभागासाठी मार्गदर्शक म्हणून नियुक्ती केली आहे. ASUS EXPERT SERIESच्या 'BUILT FOR WORRY-FREE BUSINESS' या वचनाला अधिक बळकटी देणे आणि भारतीय MSME क्षेत्राला तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने हे दीर्घकालीन सहकार्य करण्यात आले आहे. भारतातील MSME क्षेत्र हे रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासाचे महत्त्वाचे इंजिन मानले जाते. या क्षेत्राचा विस्तार वेगाने होत असताना व्यवसायांसमोर तंत्रज्ञानाशी संबंधित अनेक आव्हानेही आहेत. विशेषतः व्यवसायासाठी तयार केलेल्या संगणकांऐवजी सर्वसाधारण वापरासाठी उपलब्ध असलेल्या लॅपटॉपचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे ASUSच्या अभ्यासातून समोर आले आहे. व्यवसायांसाठी संगणक निवडताना टिकाऊपणा, कार्यक्षमता, अपग्रेड



करण्याची क्षमता, बॅटरी बॅकअप, सुरक्षा आणि विक्रीनंतरची सेवा या बाबी महत्त्वाच्या असतात. या गरजा लक्षात घेऊन ASUSने EXPERT SERIES विकसित केली आहे. वाढलेले उत्पादनक्षम आयुष्य, कमी डाउनटाइम आणि एंटरप्राइझ-ग्रेड सुविधांमुळे व्यवसायांचा एकूण मालकी खर्च (TCO) कमी करण्यावर या मालिकेचा भर आहे. राजीव तलरेजा यांनी Quantum Leapच्या माध्यमातून प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाद्वारे १२ लाखांहून अधिक व्यवसाय मालकांपर्यंत पोहोचल्याने त्यांना MSME क्षेत्रातील व्यावसायिकांच्या प्रत्यक्ष गरजांची व्यापक जाण आहे. त्यामुळे ASUSसाठी त्यांचे मार्गदर्शन हे केवळ विपणनापुरते मर्यादित न राहता, उत्पादन विकासासाठी सातत्यपूर्ण अभिप्राय देणारे महत्त्वाचे माध्यम ठरणार आहे. या भागीदारीपूर्वी तलरेजा आणि त्यांच्या टीमने ASUS EXPERT SERIESमधील संगणक स्वतःच्या कामकाजासाठी वापरून पाहिले. तसेच MSME समुदायामध्ये स्वतंत्र सर्वेक्षण करण्यात आले. ASUSने केलेल्या संशोधनातून समोर आलेल्या गरजांशी या सर्वेक्षणाचे निष्कर्षही जुळले.

ASUS Commercial PC Businessचे भारत, श्रीलंका आणि नेपाळसाठी उपाध्यक्ष दिनेश शर्मा म्हणाले, "भारतीय MSMEsना जागतिक स्तरावरील क्षमता विकसित करण्यासाठी सक्षम करण्याची राजीव यांच्यासोबत आमची समान दृष्टी आहे. MSMEs हे भारताच्या आर्थिक विकासाचे प्रमुख चालक ठरणार आहेत. AIच्या युगात व्यवसायांसाठी PCचे महत्त्व आणखी वाढले आहे. सुरक्षित, उच्च-कार्यक्षम आणि लवचिक संगणकीय प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून ASUS EXPERT SERIES खऱ्या अर्थाने चिंतामुक्त व्यावसायिक अनुभव देण्यासाठी तयार करण्यात आली आहे." ते पुढे म्हणाले की, "हे सहकार्य केवळ विपणन संवादापुरते मर्यादित नाही. MSME क्षेत्राकडून सातत्याने अंतर्दृष्टी मिळवणे, ASUSच्या मूल्य प्रस्तावात नावीन्य आणणे आणि MSMEsना त्यांच्या विकासाची क्षमता साध्य करण्यासाठी सक्षम करणे हा या भागीदारीचा मुख्य उद्देश आहे." या भागीदारीबद्दल राजीव तलरेजा म्हणाले, "गेल्या २० वर्षांत व्यवसाय मालकांनी आमच्यावर ठेवलेल्या विश्वासाला मी खूप महत्त्व देतो. त्यामुळे माझ्याशी संपर्क साधलेल्या अनेक ब्रँड्ससोबत मी भागीदारी केली नाही. ASUSने मात्र वेगळा प्रश्न विचारला—'मी त्यांचा प्रचार करेन का?' हा नव्हे, तर 'MSMEsना खरोखर कशाची गरज आहे, हे मी त्यांना सांगेन का?' हा प्रश्न त्यांनी विचारला."

# गोखळीच्या पथकांचा दहीहंडीचा थरार

■ सासवड (दै. संध्या)

सासवड शहरात गोकुळाष्टमीच्या पर्वावर 'श्री हनुमान दहीहंडी उत्सव मंडळा'चा ३४ वा वर्धापन दिन अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. या भव्य महोत्सवात बालगोपाळांच्या नृत्य स्पर्धा, 'शिवरुद्र वाद्य पथक'च्या कडकडाटातील ढोल-ताशांचे वादन आणि गोविंदा पथकांचे अंगावर काटा आणणारे धाडस यामुळे संपूर्ण सासवड परिसर अक्षरशः दुमदुमून गेला.

उत्सवाच्या पूर्वार्धात ४ आणि ५ सप्टेंबर रोजी विविध आकर्षक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ४ सप्टेंबर रोजी पार पडलेल्या लहान मुलांच्या नृत्य स्पर्धेत बालगोपाळांनी आपल्या कलागुणांचे बहारदार सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर ५ सप्टेंबर रोजी झालेल्या लहान मुलांच्या स्पर्धा आणि मुख्य आकर्षण ठरलेले

■ सासवडमध्ये ढोल-ताशांच्या गजरात 'श्री हनुमान' मंडळाच्या ३४ व्या दहीहंडीचा थरार

'शिवरुद्र वाद्य पथक' यांचे अंगावर काटा आणणारे उत्कृष्ट ढोल-ताशांचे वादन याने उपशस्थितांमध्ये एकच जोश भरला.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात 'श्री हनुमान दहीहंडी संघ, गोखळी' या शिस्तबद्ध आणि जिद्दी गोविंदा पथकाने आपल्या अचूक नियोजनाच्या जोरावर तब्बल ७ वा थर रचत यंदाची मानाची दहीहंडी यशस्वीरित्या फोडली. त्यांच्या या नेत्रदीपक साहसामुळे उपस्थितांनी एकच जल्लोष केला.

गणेश बाळासाहेब बांदल यांच्याकडून ५५,५५५ रुपये आणि प्रत्यक्ष जमा झालेली रक्कम मिळून एकूण ६०,००० रुपयांचे भरघोस रोख इनाम विजयी संघास देण्यात आले. स्व. संजय निकोडे यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा मानाचा भव्य चषक देऊन



विजेत्या संघाचा गौरव करण्यात आला. हंडी फोडणाऱ्या मुख्य गोविंदास ३,३३३ रुपये रोख व चांदीची गदा देऊन विशेष सन्मानित करण्यात आले.

# पुणे जिल्हा परिषद पुणे, बांधकाम विभाग (दक्षिण)

## जाहीर बी - 01 निविदा सुचना क्रं. 02/2025-2026

पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग दक्षिण , पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे तर्फे खालील कामाचे नावासमोर नमुद केलेप्रमाणे पुणे जिल्हा परिषदेकडील योग्य त्या कंत्राटदाराकडुन खाली नमुद कामाच्या सीलबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (दक्षिण),निविदा शाखा, जिल्हा परिषद पुणे-411001 , यांच्या कार्यालयातून दि. 08-9-2026 सकाळी 10.00 वा पासून ते दि. 15-9-2026 (सुट्टीचे दिवस सह ) दु. 5.00 वा. पर्यंत देणेत येतील. सीलबंद भरलेल्या निविदा कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग (दक्षिण ) जिल्हा परिषद पुणे येथे दि. 16-9-2026 रोजी दु. 5.00 वा. पर्यंत स्विकारणेत येतील आणि शक्य झाल्यास त्याच दिवशी किंवा त्यानंतर कार्यालयीन सोईच्या दिवशी सक्षम समितीसमोर उघडणेत येतील.

| अ. क्रं. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम रु. | एकूण अनामत रक्कम | कामाची मुदत (महिने) | आवश्यक कंत्राटदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बो-हाळवाडी येथे अंतर्गत रस्ता करणे ता.पुरंदर | 845519/- | 590/- | निविदा रकमेच्या 1% | 2% | 03 महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग 1 ते 7 सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| 2 | गोलेगाव येथील पडवळवस्ती रस्ता सुधारणा करणे ता.शिरुर | 845909/- | 590/- | निविदा रकमेच्या 1% | 2% | 03 महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग 1 ते 7 सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| 3 | मौजे हिंगणगाव आप्पा थोरात घर ते तबाजी गडदे घर रस्ता करणे | 847996/- | 590/- | निविदा रकमेच्या 1% | 2% | 03 महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग 1 ते 7 सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| 4 | मौजे फुलगाव स्मशानभूमी रस्ता करणे | 843980/- | 590/- | निविदा रकमेच्या 1% | 2% | 03 महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग 1 ते 7 सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| 5 | मौजे नायगाव कटके वस्ती येथील अंतर्गत रस्ता कॉक्रीटकरण करणे | 845669/- | 590/- | निविदा रकमेच्या 1% | 2% | 03 महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग 1 ते 7 सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| 6 | मौजे टिळेकरवाडी चौक ते चौरेवस्ती रस्ता तयार करणे ता. हवेली | 848207/- | 590/- | निविदा रकमेच्या 1% | 2% | 03 महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग 1 ते 7 सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| 7 | मौजे कुंजीरवाडी आठवडे बाजार संरक्षक भिंत बांधणे | 844592/- | 590/- | निविदा रकमेच्या 1% | 2% | 03 महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग 1 ते 7 सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| 8 | मौजे आळंदी म्हातोबाची रामोशीवाडी येथे विरंगुळा केंद्र सभागृह बांधकाम करणे | 846178/- | 590/- | निविदा रकमेच्या 1% | 2% | 03 महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग 1 ते 7 सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| 9 | थेऊर चिंतामणी गणपती मंदिर येथे परिसर सुधारणा करणे ता.हवेली | 845717/- | 590/- | निविदा रकमेच्या 1% | 2% | 03 महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग 1 ते 7 सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| 10 | मौजे श्री.क्षेत्र तुळापूर ( गावठाण) विठ्ठल रुक्मीणी मंदिराचे सुशोभिकरण करणे ता.हवेली | 845339/- | 590/- | निविदा रकमेच्या 1% | 2% | 03 महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग 1 ते 7 सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| 11 | मौजे पिंपरी सांडस ग्रामसचिवालय सुधारणा करणे ता.हवेली | 844475/- | 590/- | निविदा रकमेच्या 1% | 2% | 03 महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग 1 ते 7 सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |

### निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

1) कोऱ्या निविदा संचासाठी अर्जासोबत उपरोक्त कामाचे नावासमोर नमूद केलेप्रमाणे योग्य त्या वर्गाचे नोंदणी प्रमाणपत्र, मुळ प्रती दाखविलेनंतर त्यांना कोरे निविदा संच्यासाठी भरणा चलन तयार करुन देणेत येईल.

2 कोऱ्या बी -1 नमुन्याची रक्कम रोख स्वरुपात चलनाने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा जिल्हा परिषद पुणे (विस्तारीत कक्ष) खाते क्रं.29/1 येथे भरुन चलन दाखविल्यास निविदा उपलब्ध होतील.

3) सीलबंद निविदेच्या लिफाफा क्रं.1 मध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या सत्यप्रती सादर कराव्या लागतील.

(अ) वरील प्रमाणे आवश्यक नोंदणी प्रमाणपत्र .

(आ) निविदा फॉर्म फी भरणा चलनाची प्रत.

(इ) इसारा रकमेचा पुणे येथे देय होणारा मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जि.प.पुणे (C.A. & F.O. Z.P. Pune A/c No.29/26 payable @ Pune) या नावे काढणेत आलेला धनाकर्ष (D.D.) बयाणा रक्कम सुट प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही . तसेच सु.बे.अ. व म.स.स. यांनीही ही खुल्या गटातील निविदा असल्याने बयाणा रक्कम भरणे बंधनकारक आहे.

(ई) प्राप्तीकर पॅनकार्ड व जी.एस.टी प्रमाणपत्र शेवटचे तीन वर्षाचे आय.टी. आर. PTRA and PTC

(टिप :- उपरोक्त कागदपत्रांपैकी एकही कागदपत्र सादर केलेले नसल्यास सदर ठेकेदाराची निविदा बाद करणेत येईल व आर्थिक लिफाफा (Financial Bid) उघडणेत येणार नाही. तसेच कोणतेही कागदपत्र सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.)

4) सीलबंद निविदेच्या लिफाफा क्रं.2 मध्ये प्रत्येक पानावर ठेकेदाराचा स्वत:चा सही व शिक्का असलेला तसेच दर अंकी व अक्षरी लिहीलेला खात्याने साक्षांकित करुन दिलेला निविदा फॉर्म सादर करावा.

5) अ ) पात्र निविदा धारकांकडून विहित सुरक्षा अनामत रक्कम ही कामाचा करारनामा करतेवेळी कार्यकारी अभियंता बांधकाम दक्षिण विभाग, जिल्हा परिषद पुणे यांचे नांवे ठेव पावती स्वरुपात / चलनाने रोख स्वरुपांत घेतली जाईल व उर्वरीत अनामत रक्कम प्रथम देयकांतुन कपात केली जाईल.

6) निविदा देकार 1 % पर्यंत कमी असल्यास अतिरिक्त सुरक्षा अनामत भरण्याची आवश्यकता नाही .

7) निविदाधारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 1.01%पासुन ते 10% पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन कामाच्या किंमतीच्या 1% एवढया रकमेचा पुणे येथे देय असलेला मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.पुणे खाते क्रं.29/26 या नावाने काढलेला धनाकर्ष (डी.डी.) (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून लिफाफा क्रं.2 मध्ये सादर करावा . (उदा. 1 ते 10.00 % पर्यंत कमी दर 1 % रक्कम)

८) निविदाधारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 10% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार 10% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढया रकमेचा वरील (4)प्रमाणे येणाऱ्या रकमेसह पुणे येथे देय असलेला मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.पुणे खाते क्रं.29/26 या नावाने काढलेला धनाकर्ष (डी.डी.) (Demand Draft) जो परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून लिफाफा क्रं.2 मध्ये सादर करावा (उदा.10% पर्यंत कमी दर 1% व (10% ते 15% पर्यंत कमी दराने प्रति टक्का 1% दराने) 5% असे एकुण 6% रक्कम)

9) निविदा देकार अंदाजपत्रकीय दरपेक्षा 15% पेक्षा कमी दराचा असल्यास देकार 15% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे त्याच्या दोन पटीने वरील (5) प्रमाणे येणाऱ्या रकमेसह पुणे येथे देय असलेला मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.पुणे खाते क्रं.29/1 या नावाने काढलेला धनाकर्ष (डी.डी.) (Demand Draft) Demand Draft) जो परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून लिफाफा क्रं.2 मध्ये सादर करावा (उदा.15% पर्यंत कमी एकुण 6% रक्कम) व 19% पर्यंत कमी दर (19% - 15%) 4% ×2 = 8%) असे एकुण 14% रक्कम सदर डी.डी. सादर केलेला नसलेस निविदा अवैध ठरविणेत येईल.

10) निविद प्रपत्रातील व निविदा नोटीसमधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारांवर बंधनकारक राहतील. तसेच प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देताफेटाळण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला असून निविदा पाठविणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला/संस्थेला निविदा फेटाळल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

सही/-
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे जिल्हा परिषद पुणे

जा.क्र.जि.प.बांध/ले-६/२४४/२६
पुणे दि. ०७/०९/२०२६

## थोडक्यात पण महत्वाचे




### प्राधिकरण जेष्ठ नागरिक संघातर्फे शिक्षक दिन संपन्न

**प्राधिकरण निगडी : दैनिक संध्या**

दिनांक ६ सप्टेंबर रोजी स्वतंत्र भारताचे दुसरे राष्ट्रपती भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त, निगडी येथील, दादा दादी विरंगुळा केंद्रामध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राध्यापक भूषण ओझर्डे होते. सरस्वती व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन झाल्यानंतर श्री.सुभाष बोरोले यांनी स्वागत गीत सादर केले. प्रा.ज्ये.नागरिक संघाचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर जोशी यांनी मनोगत व्यक्त करताना प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघात चालत असलेल्या कार्याचा आढावा घेतला. श्री भानुदास सोनगिरे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिल्यावर, संघाचे अध्यक्ष, श्री. चंद्रशेखर जोशी यांनी पाहुण्यांचा यथोचित सन्मान केला. आपल्या भाषणात, विद्यार्थ्यांचा कल ओळखून त्याला आपले करिअर निवडण्यास स्वातंत्र्य द्यावे असे त्यांनी सांगितले. श्रीमती विजयमाला आहेर यांनी दिलेल्या ₹ ५१०००/- रुपयांच्या देणगीतून तीन शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आले. त्यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.सत्कारार्थी होते.. श्री.नाथा मानकर, श्री.विजय पापत व डॉ.सौ.रजनी शेठ. त्यांचा परिचय अनुक्रमे श्री. श्रीराम शिंपी,श्री.श्रीनिवास ठोंबरे व श्रीमती विजया आहेर यांनी करून दिला. त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.परीक्षक सौ संध्या हगवणे यांनी परीक्षणाबाबत आपले मत व्यक्त केले.त्यांचाही शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. शिक्षकांच्या यादीचे वाचन श्रीमती कुंदा कोळपकर (शिक्षण व सहल समिती प्रमुख) व श्री.भगवान महाजन(माजी अध्यक्ष) यांनी केले. ६४ निवृत्त शिक्षकांना, संघातर्फे भेटवस्तू प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कुंदा कोळपकर यांनी केले.श्री.दिलीप गोसावी (उपाध्यक्ष) यांनी आभार मानले. सदर बातमीचा आढावा वरीष्ठ पत्रकार बाबू डिसोजा यांनी घेतला.

### कोयत्याचा धाक दाखवून दगड डोक्यात घालून खंडणी उकळणाऱ्या आरोपींना अटक

**तळेगाव दाभाडे : दैनिक संध्या**



तळेगाव दाभाडे परिसरात एकाला कोयत्याच्या धाकाने धमकावत तसेच दगड डोक्यात घालून जखमी करत १ हजार रुपयांची खंडणी उकळल्या प्रकरणी तळेगाव दाभाडे पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना ४ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी साडेसात ते आठ वाजण्याच्या दरम्यान इंद्रायणी हॉटेलसमोर घडली. याप्रकरणी संतोष लक्ष्मण शेडगे (वय ४०, रा. चिखलसे, ता. मावळ) यांनी तक्रार दाखल केली आहे. तर याप्रकरणी अरविंद अमरेश कोळी (वय २२, रा. शंकरवाडी सोमाटणे फाटा) व शुभम हनुमंत कोळी (वय २५, रा. शंकरवाडी, अंगण हॉटेलच्या मागे सोमाटणे) दोघेही तळेगाव दाभाडे परिसरातील असून यांना अटक करण्यात आली आहे. फिर्यादी शेडगे हे त्यांच्या कारमधून जात असताना आरोपींनी त्यांचे वाहन अडवले. आर्थिक फायद्यासाठी आरोपींनी त्यांच्याकडे १ हजार रुपयांची मागणी केली. पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपींनी तक्रारदाराला वाहनातून खाली उतरवून मारहाण करत जबरदस्ती पैसे घेतले. तसेच एका आरोपीने हातातील कोयता दाखवत जीवे मारण्याची धमकी दिली. यावेळी आरोपींनी परिसरात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने कोयता फिरवत नागरिकांनाही धमकावल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. घटनास्थळी नागरिकांची गर्दी जमू लागल्याने आरोपी तेथून पसार झाले होते. मात्र पोलिसांनी तत्काळ कारवाई करत दोघांना अटक केली. या प्रकरणी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गावडे आणि पोलीस उपनिरीक्षक चव्हाण हे करत आहेत.

### मोबाईलवर फेक ई-चलन पाठवून ६ लाख ८८ हजारांची फसवणूक

**पिंपरी : दैनिक संध्या**




मोबाइलवर ट्रॅफिक ई-चलन आल्याचे भासवून एका अज्ञात सायबर चोरट्याने व्यावसायिकाच्या बँक खात्यातून ६ लाख ८८ हजार रुपये लंपास केले. ही घटना बुधवारी दुपारी तीन ते सायंकाळी पाचच्या सुमारास घडली. हॉट्स अॅपवर इ-चलन फाइल पाठविणाऱ्या चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंदल नथुनी चौहान (वय ४४, रा. ज्योती इंग्लिश स्कूल शेजारी, शिवशंभू निवास, नेहरूनगर, पिंपरी) यांनी फिर्याद नोंदवली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर चोरट्याने फिर्यादीच्या व्हॉट्स अॅपवर इ-चलन असल्याचे भासवून एक एपीके फाइल पाठवली. फिर्यादीने ती फाइल उघडताच आरोपीने त्यांच्या मोबाइलचा बेकायदेशीर अॅक्सेस मिळवला. त्यानंतर फिर्यादीच्या आयडीबीआय बँकेच्या खात्यावरून परस्पर तब्बल ६ लाख ८८ हजार रुपये ट्रान्सफर करून आर्थिक फसवणूक केली.

### सोसायटीत पाळीव कुत्र्याचा ज्येष्ठ नागरिकांवर हल्ला, पोलिसात गुन्हा दाखल

**पिंपरी : दैनिक संध्या**




सोसायटीतील नागरिकांना पाळीव कुत्रा चावू शकतो याची कल्पना असतानाही कुत्रा मोकळा सोडला. या पाळीव कुत्र्याने दोन ज्येष्ठ नागरिकांना चावा घेऊन जखमी केले. ही घटना गुरुवार रात्री ८:३० वाजता चोली हद्दीतील जेनेसीस सोसायटी, वडमुखवाडी येथे घडली. आरोपी विक्रम रामस्वरूप बक्षी (वय ५८, रा. जेनेसीस सोसायटी, वडमुखवाडी, ता. हवेली, पुणे) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. प्रकाश केशव पवार (वय ७०, रा. जेनेसीस सोसायटी, वडमुखवाडी) यांनी फिर्याद नोंदवली आहे. आरोपी बक्षी यांनी पाळलेले कुत्रे आक्रमक असूनही त्यांनी कोणतीही काळजी घेतली नाही. वारंवार समज देऊनही त्यांनी कुत्रे इमारतीच्या परिसरात मोकळे सोडले. गुरुवारी रात्री फिर्यादी आणि त्यांचे शेजारी नसिब नारायण ठाकूर (वय ६७) सोसायटीत असताना मोकळ्या सोडलेल्या कुत्र्याने त्यांच्यावर अचानक हल्ला करत दोघांनाही चावा घेऊन जखमी केले. या प्रकरणाचा तपास दिघी पोलीस करत आहेत.

# नागरिकांची गैरसोय करणारा विकास नको

## निगडीतील हरित सेतूवरून खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका प्रशासनाला सुनावले

**प्रशासनाने हट्ट न सोडल्यास नागरिक फूटपाथ उखडून टाकतील**

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने निगडी प्राधिकरणातील अंतर्गत रस्त्यांवर दोन्ही बाजूंनी हरित सेतूच्या नावाखाली गरजेपेक्षा मोठे फुटपाथ बांधण्यात येत आहेत. यामुळे फूटपाथ मोठे झाले आहेत. मूळ रस्ते अत्यंत अरुंद झाले असून वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. हरित सेतूला स्थानिकांचा विरोध आहे. नागरिकांची गैरसोय करणारा विकास नको, स्थानिक नागरिकांच्या भावनांचा विचार करावा अशी सूचना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका प्रशासनाला दिली. प्रशासनाने हट्ट सोडला नाही आणि लोकांची गैरसोय थांबवली नाही, तर नागरिक स्वतः असे रस्ते आणि फुटपाथ उखडून टाकतील, असा इशाराही त्यांनी दिला. निगडी प्राधिकरणातील अंतर्गत रस्त्यांवर सुरू असलेल्या हरित सेतूच्या कामाला स्थानिक नागरिकांचा विरोध आहे. या पार्श्वभूमीवर खासदार बारणे या परिसराला भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. खासदार बारणे म्हणाले, पिंपरी-चिंचवड शहरात 'स्मार्ट सिटी' उपक्रमांतर्गत आणि महापालिकेकडून सुरू असलेल्या रस्त्यांच्या आणि फुटपाथच्या कामांवरून स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. प्रशासनाच्या हेकट कारभारामुळे आणि नियोजनशून्य विकासकामामांमुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. यासंदर्भात प्रशासनाने तातडीने योग्य ती कारवाई करावी आणि करदात्यांच्या पैशांची उधळण थांबवावी.

> कोणताही विकास प्रकल्प राबवण्यापूर्वी स्थानिक नागरिकांशी चर्चा करून त्यांच्या गरजा समजून घेतल्या पाहिजेत. करदात्यांचा निधी अनावश्यक डिझाईन्स आणि दिखाऊ सुशोभीकरणावर उधळण्याऐवजी योग्य कामांसाठी वापरला गेला पाहिजे. नागरिकांची गैरसोय होणार नाही, अशाच पद्धतीने रस्ते व फुटपाथचे नियोजन करावे. या प्रश्नाबाबत लवकरच महापालिका आयुक्तांना अधिकृत पत्र देऊन तीव्र विरोध दर्शवण्यात येणार असल्याचेही खासदार बारणे यांनी सांगितले.

प्राधिकरणाने पूर्वी दिलेल्या भूखंडांवर बांधण्यात आलेल्या जुन्या पक्क्या घरांमध्ये स्वतःची पार्किंग व्यवस्था नाही. त्यामुळे रहिवाशांना गाड्या रस्त्यावरच पार्क कराव्या लागतात. अशा परिस्थितीत फुटपाथ अर्ध्या रस्त्यापर्यंत वाढवल्याने नागरिकांची मोठी पंचाईत झाली आहे. स्मार्ट सिटी आणि सुशोभीकरणाच्या नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत. वाकडे-तिकडे डिझाईन्स करून रस्ते लहान केले जात आहेत. यापूर्वी सुशोभीकरणासाठी लावलेली किती झाडे जगली आणि किती पैसा वाया गेला, याचे ऑडिट केले पाहिजे.

प्रशासनाने स्थानिक नागरिकांना विश्वासात न घेता मनमानी कारभार सुरू ठेवला आहे. यासंदर्भात पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त तसेच संबंधित विभागाचे प्रमुख बापू गायकवाड यांच्याकडे तक्रार नोंदवण्यात आली आहे. लोकांना सोयीस्कर ठरेल असा योग्य आकाराचा फुटपाथ करण्यास आमचा विरोध नाही. मात्र, विकासाच्या नावाखाली नागरिकांना वेठीस धरणे योग्य नाही. प्रशासनाने हट्ट सोडला नाही आणि लोकांची गैरसोय थांबवली नाही, तर नागरिक स्वतः असे रस्ते आणि फुटपाथ उखडून टाकतील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

### एकादशी निमित्त माऊलींच्या संजीवन समाधी मंदिरात आकर्षक पुष्पसजावट



■ आळंदी (दै. संध्या)

अजा एकादशीच्या पावन पर्वानिमित्त आळंदी येथील जगद्गुरू संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी मंदिरात आकर्षक पुष्पसजावट करण्यात आली आहे. रंगीबेरंगी आणि विविध प्रकारच्या फुलांनी सजविण्यात आलेल्या मंदिरामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय आणि प्रसन्न वातावरणाने उजळून निघाला आहे. एकादशी निमित्त मंदिरात पहाटेपासून धार्मिक विधी, अभिषेक, भजन-कीर्तन तसेच हरिनाम सप्ताहाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. "ज्ञानोबा-तुकाराम"च्या गजरात आणि हरिनामाच्या अखंड घोषात आळंदी नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मंदिरातील विशेष पुष्पसजावट भाविकांचे मुख्य आकर्षण ठरत असून सजावटीचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहत आहेत. फुलांच्या मनमोहक आरासीत संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीचे दर्शन घेताना भाविकांना आध्यात्मिक समाधान लाभत आहे. एकादशीच्या निमित्ताने मंदिर परिसरात उत्साहाचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले असून, दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळत आहे.

### संस्कारक्षम तरुण पिढी घडविण्याचे काम शिक्षकांनी करावे

■ पिंपरी (दै. संध्या)




**नंदकुमार सातुर्डेकर**

देशाची सद्यस्थिती पाहता राजकारण्यांचे तरुणांच्या समस्यांकडे लक्ष नाही. शिक्षण क्षेत्रात अनागोंदी वाढली आहे. प्रवेशाबाबत अडचणी, नीट सारख्या परीक्षांचा घोळ या सर्व अडचणीतून शिक्षण घेऊन पुढे बेकारीचे संकट, बोकाळलेला भ्रष्टाचार यामुळे तरुण वर्ग नैराश्याच्या खाईत लोटला जात आहे हजारो तरुण व्यसनाच्या आहारी जात आहेत. काही आत्महत्या करत आहेत. नैराश्य अवस्थेतून तरुणांना बाहेर काढण्यासाठी संस्कारांची गरज आहे हे काम शिक्षकच करू शकतील असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांनी येथे केले. मराठवाडा प्रतिष्ठान पिंपरी चिंचवड या संस्थेच्या देवगिरी इंग्लिश मीडियम स्कूल आणि मातोश्री प्राथमिक विद्यामंदिर (चिखली) या शाळेतील शिक्षकांचा शिक्षक दिनानिमित्त ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अध्यक्ष माजी नगरसेवक कुमार जाधव, उपाध्यक्ष उत्तम दंडीमे, लक्ष्मण लिंबापुरे, संचालिका स्मिता जाधव, प्रीती शिंदे, पूजा जाधव, प्रिन्सिपॉल शहिदा सय्यद आदी उपस्थित होते. यावेळी सातुर्डेकर म्हणाले की भारतीय संस्कृतीत कृतज्ञता महत्त्वाची आहे. आपल्या संस्कृतीत गुरूला मोठे स्थान आहे मातृदेवो भव,पितृ देवो भव,आचार्य देवो भव, असे म्हटले जाते. जीवनाची परिपक्वता म्हणजे शिक्षण असे स्वामी विवेकानंदांनी म्हटले होते. ही परिपक्वता शिष्यामध्ये येण्यासाठी जे कष्ट घेतात ते खऱ्या अर्थाने गुरु होत. आपल्याकडे ऋषीमुनींच्या काळात गुरुकुल पद्धती द्वारा हा प्रयत्न खऱ्या अर्थाने झाला. मात्र कालानुरूप सगळे बदलले आहे. विद्यार्थी संख्या वाढल्याने विद्यार्थ्यांची नावे सुद्धा शिक्षकांना आठवत नाहीत अशी परिस्थिती आहे. बऱ्याच घरात आई-वडील दोघेही नोकरीस असल्याने त्यांना मुलांकडे लक्ष द्यायला वेळ नाही. म्हणूनच शिक्षकांकडे आशेने पाहिले जाते. आजही सर्वात प्रामाणिक घटक म्हणून शिक्षकालाच मान्यता आहे म्हणूनच साक्षरतेचे काम असो कुटुंब नियोजनाचा प्रसार असो की मतदार याद्यांचे काम असो मायबाप सरकारला शिक्षकच आठवतात मात्र शिक्षकेतर कामांचा बोजा शिक्षकांवर लादला जात असल्याने त्यांची कार्यक्षमता कमी होत आहे. असे सातुर्डेकर म्हणाले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष कुमार जाधव, उपाध्यक्ष उत्तम दंडीमे, संचालिका प्रीती शिंदे, प्रिन्सिपल शहिदा सय्यद, तसेच कीर्ती दुरुगकर, मालन गाडीलकर, वर्षाली चेंगे, सबीना सय्यद, आरती खोडसुरे या शिक्षिकांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन शितल तुपे व तेजना गिरमे यांनी केले.

### महाकवी कालिदास प्रतिष्ठान पुणे या संस्थेची ब्रह्मेंद्र स्वामी मंदिरास भेट

■ पिंपरी (दै. संध्या)



दिनांक ३ सप्टेंबर रोजी ऐतिहासिक झाशीची राणी यांचे जन्मगाव असलेल्या धावडशी ( सातारा) या निसर्गरम्य गावातील श्री ब्रह्मेंद्रस्वामी हायस्कूल धावडशी ता. जि. सातारा येथे पुण्यातील ख्यातनाम महाकवी कालिदास प्रतिष्ठान पुणे या संस्थेच्या ३० साहित्यिक, कवी व कवयित्री यांनी सदिच्छा भेट दिली. शाळेची गुणवत्ता, डिजिटल फलक, बस सुविधा इंटरनेट सुविधा अध्ययन निष्पत्ती नुसार अध्यापन व शाळेच्या इतिहासाचा डिजिटल व्हिडिओ पाहून शाळेचे व संस्थाचालकांचे तसेच शिक्षकांचे कौतुक केले. विशेष म्हणजे महाकवी कालिदास प्रतिष्ठान पुणे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक, भावकवी हे मुळ सातारकर असून धायरीकरांशी म्हणजे स्व. ऍडव्होकेट मनोहरपंत भागवत, स्व. डॉ. विठ्ठलराव पेंढारकर, स्व. जगूआण्णा पवार यांच्याशी तसेच ग्रामस्थांशी अत्यंत जवळचे ऋणानुबंध होते याचा आम्हाला अभिमान आहे असे उद्गार शाळेच्या अध्यक्षांनी काढले. या कार्यक्रमामध्ये प्रामुख्याने प्रा. डॉ. महेंद्र ठाकुरदास, मा श्री मिलिंद जोशी, बंडा जोशी, मकरंद घाणेकर, अशोक भांबुरे, सुरेश शेठ, शुभदा उदगावकर, जयश्री श्रोत्रिय, यशवंत देव, सुधीर बोकील, अंजली महाजन, प्रमोद पिसाळ, प्रा गिरीश बक्षी, वंदना घाणेकर, त्र्यंबक बोरीकर, अॅड. पाचुणकर, शिंगवेकर सुधीर कुबेर, राजश्री सोले, व इतर मान्यवर कविवर्य उपस्थित होते. शालाप्रमुख मा श्री सुनील चौधरी यांनी प्रास्ताविक करून सर्वांचे स्वागत केले. संस्था विश्वस्त मा डॉ गिरीश पेंढारकर, डॉ. अभिराम पेंढारकर कुटुंबीय यांनी सर्वांचे पुष्प गुच्छ देऊन विनम्र स्वागत केले. पंचायत समिती साताराचे सदस्य व संस्था सचिव मा प्रभाकर पवार (आप्पा) यांनी शाळेच्या भौतिक सुविधांबद्दल माहिती देऊन स्वागत केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री कोरे सर यांनी संस्थापक कै डॉ विठ्ठलराव पेंढारकर व उपाध्यक्ष जगुआण्णा पवार यांच्या कार्याची कविता सादर केली. महाकवी कालिदास प्रतिष्ठान पुणे तर्फे शाळेला ग्रंथालयासाठी पुस्तके सदिच्छा भेट म्हणून प्रदान करण्यात आली. कार्यक्रमास विश्वस्त मा गणपत आप्पा पवार मा दिलीप बापू पाटील मा.श्री अशोक कापसे मा श्री आण्णासो पवार मा श्री संजय पवार संचालक महेश कोकीळ, शिक्षक आणि विद्यार्थी तसेच आदि ग्रामस्थ मान्यवर उपस्थित होते. वरीष्ठ पत्रकार बाबू डिसोजा यांनी वृत्त आढावा घेतला.

### संदीप वाघेरे युवा मंचाचा भव्य दहीहंडी उत्सव जल्लोषात संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)



श्री संदीप वाघेरे युवा मंचाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला भव्य दहीहंडी उत्सव २०२६ शनिवारी (दि. ५ सप्टेंबर) पिंपरीगाव येथे मोठ्या उत्साहात, जल्लोषात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. चेंबूर येथील शितळादेवी गोविंदा पथकाने तब्बल सहा थर रचत दहीहंडी फोडण्याचा मान मिळविला. श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त आयोजित या सोहळ्याला परिसरातील हजारो नागरिक, तरुणाई आणि गोविंदा पथकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाचा आनंद घेतला. गोविंदांच्या घोषणांनी आणि उपस्थितांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. या कार्यक्रमास मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे, आयोजक श्री. संदीप वाघेरे, शिवसेना नेते तथा नगरसेविका सुलभा उबाळे, माजी आमदार गौतम चाबुकस्वार, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे, विकास साने, विराज लांडे, नगरसेविका भीमाताई फुगे निकिता कदम, प्रियांका कुदळे, मीनाताई नाणेकर, श्रीरंग शिंदे, ज्ञानोबा गव्हाणे, सुधाकरजी यादव, वसंत तावरे, रामभाऊ कुदळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. दहीहंडी उत्सवासाठी प्रसिद्ध सिनेअभिनेत्री राशी खन्ना, महिमा मकवाना, नेहा सोनवणे आणि रुचिता जामदार यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त झाले. अभिनेत्रींच्या उपस्थितीने तरुणाईमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला.

# थेरगावमधील केजुदेवी उद्यान आणि केजुबाई बंधारा विकासाला मंजुरी


**'वनगंध' प्रकल्पांतर्गत साकारणार जलक्रीडा पर्यटन केंद्र**

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड शहराच्या वैभवात मानाचा तुरा रोवणारा आणि सौंदर्यात भर घालणारा 'वनगंध' हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प नागरिकांच्या भेटीला येत आहे. या प्रकल्पांतर्गत थेरगाव येथील बोट क्लब व केजुदेवी उद्यानाच्या नूतनीकरणाच्या कामाच्या नावामध्ये सुधारणा करून तिथे जलक्रीडा पर्यटन विकसित करण्यास स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या मान्यतेने या प्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला आहे. नुकतीच अभिषेक बारणे यांनी या प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी करून प्रकल्प विकासाची सविस्तर माहिती घेतली. तसेच, संबंधित विभागाला आवश्यक त्या महत्त्वाच्या सूचना केल्या. या प्रकल्पाच्या पाहणी दौऱ्याप्रसंगी सिद्धेश्वर बारणे,'मे. शिल्पी आर्किटेक्ट्स अँड प्लॅनर्स'चे वास्तुविशारद पारस एस. नेत्रगावकर हे देखील उपस्थित होते. शहरातील नागरिकांना निसर्ग, पाणी आणि सार्वजनिक जीवनाशी जोडणारा सर्वसमावेशक परिसर या प्रकल्पातून निर्माण केला जात आहे. नदी नागरिकांसाठी खुली करणे आणि वनातून फेरफटका मारण्याचा अनुभव देणारे सार्वजनिक केंद्र निर्माण करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. या प्रकल्पाची रचना मनोरंजन, पर्यावरण आणि संस्कृती यांच्या मिलाफातून करण्यात आली असून, येथे येणाऱ्या नागरिकांसाठी भव्य प्रवेशद्वार, आगमन क्षेत्र आणि सुसज्ज पार्किंगची व्यवस्था असणार आहे. या प्रकल्पाच्या मुख्य आकर्षणांमध्ये अॅम्फीथिएटर, समुदाय बैठक व्यवस्था, फोटो बूथ, मचान, तसेच बोटिंग जेट्टी, फेरी बोट आणि विविध जलक्रीडांचा (वॉटर स्पोर्ट्स) समावेश आहे. याशिवाय आरोग्य आणि विहारासाठी जॉगिंग ट्रॅक, मुलांचे खेळण्याचे क्षेत्र, निसर्गवाटा (नेचर ट्रेल्स), पुष्पोद्यान, इको पार्क, वॉच टॉवर, सांस्कृतिक उपक्रमांसाठी विशेष जागा, विलोभनीय घाट आणि एक मंदिर परिसर उभारला जाणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### दहीहंडी व शिक्षक दिन उत्साहात साजरा

**नारायणगाव : दैनिक संध्या**

रेडियन्स इंटरनॅशनल स्कूल, आळेफाटा येथे इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी दहीहंडीचा आनंदमय सोहळा उत्साहात साजरा केला. श्रीकृष्णाच्या वेशभूषेतील चिमुकल्यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. चिमुकल्यांनी गोपाळकाल्याचा आनंद घेत दहीहंडी फोडली. त्याचबरोबर ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत शिक्षक दिनही उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक बनून शाळेची धुरा संभाळली. शाळेच्या प्राचार्य वर्षा मदभाविकर ,उपप्राचार्य लक्ष्मीकांत गुंडारगी व सर्व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शाळेचे वातावरण आनंदमय झाले.

### आद्यक्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त प्रशासनाकडून अभिवादन



**बारामती : दैनिक संध्या**

आद्यक्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे यांनी उपविभागीय कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी नायब तहसिलदार प्रतिभा शिंदे यांच्यासह कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.



### इंद्रायणी घाटावर एकादशीनिमित्त नगरपरिषदेची विशेष स्वच्छता मोहीम

**आळंदी : दैनिक संध्या**

एकादशीच्या पावन पर्वानिमित्त आळंदी नगरपरिषदेच्या वतीने सोमवारी (ता. ७) सकाळी आठ वाजता इंद्रायणी नदी घाट परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. भाविकांना स्वच्छ व सुरक्षित वातावरणात दर्शन व स्नान करता यावे, या उद्देशाने नगरपरिषदेने हा उपक्रम हाती घेतला. मोहिमेदरम्यान घाट परिसरातील साचलेला कचरा, वाळू, गाळ तसेच इतर टाकाऊ वस्तू हटवून परिसराची स्वच्छता करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, गटनेते सचिन गिलबिले, नगरसेविका ऋतुजा घुंडरे, पूजा घुंडरे, साक्षी कुऱ्हाडे यांच्यासह चाकण नगरपरिषदेच्या नगरसेविका विजया तोडकर व विजया जाधव, किरण येळवंडे, चारुदत्त प्रसादे, अक्षय कुऱ्हाडे यांनीही स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. नगरपरिषदेचे अधिकारी-कर्मचारी, वारकरी संस्था, स्थानिक नागरिक व स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत प्रत्यक्ष श्रमदान केले. सामूहिक प्रयत्नातून इंद्रायणी घाट परिसर स्वच्छ व आकर्षक करण्यात आला. इंद्रायणी नदीचे पावित्र्य व पर्यावरण जपण्यासाठी नदीपात्रात कचरा, प्लास्टिक तसेच निर्माल्य टाकू नये, असे आवाहन यावेळी करण्यात आले. 'स्वच्छ इंद्रायणी–सुंदर आळंदी' हा संकल्प अधिक बळकट करण्यासाठी अशा स्वच्छता मोहिमा सातत्याने राबविण्यात येतील, असे नगरपरिषदेच्या वतीने सांगण्यात आले.

## प्रतीक टेकवडे व हिंदवी लोखंडे पुणे जिल्हा बॉल बॅडमिंटन संघाचे कर्णधार

■ जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य बॉल बॅडमिंटन संघटनेतर्फे ११ ते १३ सप्टेंबर २०२६ दरम्यान चंद्रपूर येथे १६ वर्षांखालील मुला-मुलींच्या ४१ व्या राज्यस्तरीय कनिष्ठ गट बॉल बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतूनच भिलाई (छत्तीसगड) येथे ३ ते ७ ऑक्टोबर २०२६ दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या मुला-मुलींच्या संघांची निवड करण्यात येणार आहे.

या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पुणे जिल्हा मुलांच्या संघाच्या कर्णधारपदी जवळार्जुन (ता. पुरंदर) येथील न्यू इंग्लिश स्कूलचा खेळाडू प्रतीक टेकवडे, तर मुलींच्या संघाच्या कर्णधारपदी महिलाश्रम हायस्कूल, कर्वेनगर येथील राष्ट्रीय खेळाडू हिंदवी लोखंडे हिची निवड करण्यात आली आहे. पुणे जिल्हा बॉल बॅडमिंटन संघटनेचे सचिव धुंडीराज गोसावी यांनी पुणे जिल्ह्याचे दोन्ही संघ जाहीर केले. भारती विद्यापीठ, पुणे येथे ९ ऑगस्ट रोजी झालेल्या निवड चाचणीमधून या संघांची निवड करण्यात आली.


पुणे जिल्हा मुलांचा संघ : प्रतीक टेकवडे (कर्णधार), स्वराज टेकवडे, संस्कार कारंडे, ऋषिकेश टापरे, समर्थ गरुड, आर्यन मोहिते, स्वयम खाडे, आयुष परदेशी, मोहम्मद अबूझार शेख व शौर्य कोलते. संघ व्यवस्थापक : कांतीलाल कोलते. पुणे जिल्हा मुलींचा संघ : हिंदवी लोखंडे (कर्णधार), प्रणाली बाराते, स्वरा कुंभारकर, ईश्वरी राक्षे, हेमलता चौधरी, ऋतुजा भोर, गायत्री राणे, प्रणेती कुडचे, चेतना टेकवडे व श्रावणी हिंगे. संघ व्यवस्थापिका : गौरी रेवाळे. न्यू इंग्लिश



■ ४१व्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पुणे जिल्ह्याचे दोन्ही संघ जाहीर

■ राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवडीची संधी

स्कूल, जवळार्जुन विद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच कला, क्रीडा, सांस्कृतिक व वैज्ञानिक क्षेत्रात उल्लेखनीय यशाची परंपरा कायम ठेवली आहे. प्रतीक टेकवडे याची पुणे जिल्हा संघाच्या कर्णधारपदी झालेली निवड ही विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात भर घालणारी ठरली आहे. या निवडीबद्दल खेळाडू प्रतीक टेकवडे व प्रशिक्षक प्रदीप खोमणे यांचे संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, सचिव मा.आ. संजय जगताप, संस्था विशेष मार्गदर्शक राजेंद्र (बापू) जगताप, आयएएस, संस्थापक सचिव प्रा. सीए. डॉ. एम. एस. जाधव, सहसचिव दत्तात्रय गवळी, व्यवस्थापन सदस्य कानिफनाथ अमराळे, रवींद्र (पंत) जगताप, सचिव (विद्या समिती), मुख्याध्यापक सतीश पिसाळ, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व ग्रामस्थांनी अभिनंदन केले. तसेच राज्यस्तरीय स्पर्धेसाठी दोन्ही संघांना शुभेच्छा देण्यात आल्या.



## जेजुरी गडावर उमाजीराजे नाईक यांची जयंती साजरी

■ जेजुरी (दै. संध्या)

सोमवार दि. 7 रोजी श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी, उमाजीराजे युथ फाउंडेशन, यांच्या वतीने मल्हार भक्त आद्य क्रांतिवीर उमाजी राजे नाईक यांच्या जयंतीनिमित्त श्री खंडोबा मंदिर महाद्वार पायरी मार्गावरील उमाजीराजे नाईक यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी श्री मार्तंड देवसंस्थानचे अध्यक्ष ॲड. विश्वास पानसे, विश्वस्त पोपट खोमणे, मंगेश घोणे, ॲड. पांडुरंग थोरवे, तसेच जेजुरीचे नगराध्यक्ष तथा पदसिद्ध विश्वस्त जयदीप बारभाई, नगरसेवक रोहित खोमणे, रमेश लेंडे, अभिजीत कुदळे, लताताई बयास तसेच उमाजीराजे युथ फाउंडेशनचे अध्यक्ष रवींद्र खोमणे, सुंदर खोमणे, माऊली खोमणे तसेच जेजुरी मधील ग्रामस्थ, खंडोबा पालखी सोहळ्याचे खांदेकरी, मानकरी, भाविक भक्त, शालेय विद्यार्थी व उमाजी राजांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षक दिन उत्साहात साजरा

■ नारायणगाव (दै. संध्या)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित श्री. पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि श्री. पांडुरंग कनिष्ठ महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

भारताचे माजी राष्ट्रपती, थोर तत्त्वज्ञ व शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाची सुरुवात त्यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी त्यांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्या शैक्षणिक विचारांचे आणि देशाच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाचे स्मरण करण्यात आले.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. अनिल पडवळ यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. शिक्षण क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान तसेच समाजाच्या जडणघडणीत शिक्षकांची असलेली भूमिका याविषयी त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देणारा



व्यक्ती नसून त्यांच्या विचारांना दिशा देणारा, गुणांना वाव देणारा आणि व्यक्तिमत्त्व घडविणारा मार्गदर्शक असतो, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील सुसंवाद महत्त्वाचा असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्यात संस्कार, सामाजिक जाणीव, आत्मविश्वास आणि जबाबदारीची भावना निर्माण करण्यामध्ये शिक्षकांचे योगदान मोलाचे असल्याचेही प्रा. पडवळ यांनी नमूद केले. प्राचार्य प्रल्हाद शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. शिक्षक दिनानिमित्त महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे आपल्या शैक्षणिक तसेच वैयक्तिक आयुष्याला योग्य दिशा मिळते, अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या. यावेळी महाविद्यालयातील शिक्षकांचा सन्मान करून त्यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. विशेष म्हणजे शिक्षक दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना शिक्षकाची भूमिका प्रत्यक्ष अनुभवता यावी, या उद्देशाने काही विद्यार्थ्यांनी एकदिवसीय शिक्षक म्हणून जबाबदारीही पार पाडली. त्यामध्ये प्राचार्य सिद्धी गाडगे, अविष्कार पोखरकर, प्रणव उनवणे, मिसबा पटेल, आरती नाईक, पायल खाडे, महिनुर पठाण,अनुष्का डुकरे,पूजा भांबेरे, रुबीना मणियार, अनुष्का अंजुम,यश त्रिभुवन, क्रांती जगदाळे, साई सोनवणे, आरती भोजने, ऋतिक राक्षे, प्रतीक डुकरे, सुमित वाघ आदी विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.तसेच शिक्षक दिनाचा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिकदृष्ट्या तसेच व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरला.

## स्मशानभूमीत संशयास्पद साहित्य आढळल्याने खळबळ

■ नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील बोरी बुद्रुक येथील सार्वजनिक स्मशानभूमीत लाल कपड्यात बांधलेल्या बाहुल्या, अनोळखी व्यक्तींचे फोटो, टाचण्या तसेच हळद-कुंकू व बुका आदी संशयास्पद साहित्य आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. रविवारी सकाळी दशक्रिया विधीसाठी स्मशानभूमीत आलेल्या ग्रामस्थांच्या निदर्शनास हा प्रकार आला.

गावातील काही नागरिक दशक्रिया विधीसाठी सार्वजनिक स्मशानभूमीत गेले होते. त्यावेळी त्यांना तेथे लाल रंगाचे कापड अंथरलेले दिसले. जवळ जाऊन पाहणी केली असता एका फुटलेल्या मडक्यात काळ्या रंगाच्या दोन बाहुल्या, अनोळखी पुरुष व महिलेचे फोटो, हळद-कुंकू, बुका तसेच फोटोंवर टाचण्या टोचलेले साहित्य आढळून आले. संबंधित फोटो गावातील



कोणत्याही व्यक्तींचे नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या घटनेनंतर स्मशानभूमीत असे साहित्य कोणी व कोणत्या उद्देशाने आणून ठेवले, याबाबत ग्रामस्थांमध्ये विविध चर्चा सुरू झाल्या आहेत; मात्र, या प्रकारामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता वस्तुस्थिती समोर येईपर्यंत संयम बाळगण्याचे आवाहन नागरिकांकडून करण्यात येत आहे.

सार्वजनिक स्मशानभूमीसारख्या ठिकाणी अशा प्रकारचे संशयास्पद साहित्य

परिसरात कुठेही अशा प्रकारच्या संशयास्पद वस्तू किंवा साहित्य आढळून आल्यास नागरिकांनी त्याला हात न लावता तातडीने स्थानिक पोलिसांना माहिती द्यावी. अफवा न पसरवता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

आढळल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. प्रशासनाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून या प्रकाराची चौकशी करावी व संबंधितांचा शोध घ्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी ग्रामपंचायतीने स्मशानभूमी परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत तसेच पुरेशी प्रकाश व्यवस्था करावी, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.

## भीमाशंकर विकासकामांची वळसे पाटलांकडून पाहणी

■ नारायणगाव (दै. संध्या)

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक पवित्र तीर्थस्थान असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर व परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या विकास आराखड्याच्या कामांना गती देण्यात येत आहे. या आराखड्यांतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी करून दिलीप वळसे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेत कामांचा आढावा घेतला. नवीन विकास आराखड्यात निगडाळे परिसरातील वाहनतळ, बसस्थानक, विविध नागरी सुविधा तसेच भक्तनिवासाचा समावेश करण्यात आला आहे. ही कामे जलद गतीने आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना वळसे पाटील यांनी संबंधित



अधिकाऱ्यांना दिल्या. भीमाशंकर गाव नवीन ठिकाणी वसविण्याच्या कामाचाही आराखड्यात समावेश आहे. नवीन गावातील घरांची रचना, गावाचे नियोजन तसेच नागरिकांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचा योग्य पद्धतीने समावेश करण्याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

## व्हॉट्सॲप स्टेटसवरून वाद; ग्रामपंचायत सदस्याला मारहाणीचा आरोप

■ नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागातील पिंपळवंडी गावात व्हॉट्सॲप स्टेटसच्या मुद्द्यावरून झालेल्या वादामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सार्वजनिक काम सुरू असलेल्या ठिकाणी दोन गटांमध्ये वाद झाल्यानंतर एका ग्रामपंचायत सदस्याला मारहाण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेनंतर संबंधित सदस्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, आळेफाटा पोलीस ठाण्यातही काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून गेल्या काही दिवसांपासून सत्ताधारी आणि विरोधी गटांमध्ये मतभेद सुरू असल्याचे समजते. या प्रकरणाच्या निषेधार्थ यापूर्वी उपोषणासह विविध मार्गांनी विरोध नोंदविण्यात आला होता. त्यामुळे गावातील राजकीय वातावरण आधीपासूनच संवेदनशील बनले होते. याच पार्श्वभूमीवर गुरुवारी सकाळी सुमारे ११ वाजता सार्वजनिक कामाच्या ठिकाणी व्हॉट्सॲप स्टेटसच्या कारणावरून दोन गट आमनेसामने आले. सुरुवातीला शाब्दिक वाद झाल्यानंतर परिस्थिती चिघळली. यावेळी सरपंचाच्या पतीने विरोधी गटातील ग्रामपंचायत सदस्याला मारहाण तसेच धक्काबुक्की केल्याचा आरोप करण्यात आला आहे. घटनेनंतर जखमी ग्रामपंचायत सदस्याने सहकाऱ्यांसह आळेफाटा पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. वैद्यकीय अहवाल प्राप्त झाल्यानंतर दुखापतीचे नेमके स्वरूप स्पष्ट होणार आहे. दरम्यान, या प्रकरणात राजकीय हस्तक्षेपातून तडजोड घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू असल्याची चर्चा परिसरात आहे.

## नारायणगाव महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

■ नारायणगाव (दै. संध्या)

ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव येथील वाणिज्य विभाग व संशोधन केंद्राच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त "शिक्षक दिन समारंभ" या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांचे स्वागत, प्रतिमा पूजन व ग्रामोन्नती गीताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निकिता कहर (विभाग प्रमुख) यांनी केले. त्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद केले.

त्यानंतर प्रमुख पाहुणे, प्राध्यापक व विद्यार्थी प्राध्यापकांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. तसेच महाविद्यालयातील उपस्थित गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे "विद्यार्थी शिक्षक मनोगत" हा उपक्रम. यामध्ये सूर्यवंशी श्रेया, बनकर स्नेहा, राया खुशी, मुळे प्राची, जाधव साक्षी, माने हेमंत, खिलारी प्रतीक्षा (प्राचार्य) आणि थोरात स्वप्नाली या विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनातील शिक्षकांचे योगदान, मार्गदर्शन आणि प्रेरणा याबद्दल मनोगत व्यक्त करून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यानंतर मा.डॉ.एस.डी.टाकळकर, प्रमुख व समन्वयक – वाणिज्य विद्याशाखा व संशोधन केंद्र प्रमुख यांचे मान्यवर मनोगत झाले. त्यांनी शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देत शिक्षक-विद्यार्थी संबंध, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये शिक्षकांची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत डॉ. आनंद कुलकर्णी, प्राचार्य, नारायणगाव महाविद्यालय यांनी केले. त्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व अधोरेखित करत शिक्षकांनी बदलत्या शैक्षणिक परिस्थितीनुसार स्वतःमध्ये सातत्याने सुधारणा करावी आणि विद्यार्थ्यांना ज्ञानासोबतच संस्कार व मूल्यांची शिकवण द्यावी, असे प्रतिपादन केले. व्यवसाय प्रशासन प्रमुख डॉ. अनुराधा घुमटकर यांनी मुलांना शिस्तीचे पालन करून शिक्षकांचे महत्व पटवून दिले. तसेच अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.आकाश कांबळे यांनी मुलांना शुभेच्छा देऊन सर्व विद्यार्थी शिक्षकांचे कौतुक केले.या कार्यक्रमाचे आयोजन डॉ.विनोद पाटे डॉ.आबा जगदाळे डॉ. वैशाली मोढवे डॉ.सारिका जगदाळे, प्रा. सविता खरात डॉ.अपेक्षा शिंदे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तनुजा सकपाळ या विद्यार्थिनीने केले,कार्यक्रमाचे आभार आदिती शेळके या विद्यार्थिनीने मानले.

# शिवनेरीवर महादेव कोळी चौथरा अभिवादन सोहळा संपन्न

■ नारायणगाव (दै. संध्या)

रविवारी दिनांक ६ सप्टेंबर २०२६ रोजी शिवनेरी किल्ल्यावर महादेव कोळी स्मारका जवळ स्वराज्य प्राप्तीसाठी सोळाशे महादेव कोळीगीरांनी केलेल्या बलिदानाच्या प्रित्यर्थ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्रातील सर्व कानाकोपऱ्यातून आलेल्या आदिवासी समाज बांधवांनी ह्या थोरवीरांना श्रद्धांजली अर्पण केली व या वीर क्रांतिकारकांना विनम्र अभिवादन करून त्यांच्या कार्याची व पराक्रमाची माहिती सांगितली.

याप्रसंगी प्राध्यापक चिंतामणी सर यांनी आदिवासी समाज व चळवळीची दिशा याबाबत मार्गदर्शन केले. तर प्राध्यापक संजय साबळे इतिहास अभ्यासक यांनी आदिवासी विचारधारा समस्या याबाबत अनमोल मार्गदर्शन केले. तदनंतर विक्रम कवठे, सुप्रसिद्ध आदिवासी गायक व गीतकार जगन भाऊ खोकले यांनी शूरवीरांचा पोवाडा व गीते सादर केली.

या कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळ्यास सभापती कमलताई शेळकंडे यांनी पुष्पहार अर्पण करून केली. पदयात्रेची मशाल व आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या पुतळ्याची मिरवणूक शिवाजी महाराज चौक ते किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी कोळी चबुतरा पर्यंत काढण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्यातील आदिवासी समाजाचे नेते, कार्यकर्ते आणि तमाम समाज बांधव उपस्थित होता.





इतिहासामध्ये स्वराज्य प्राप्तीसाठी महादेव कोळी समाजाने अनेक उठाव केले. मौलानविरुद्ध अनेक वेळा निकालाची झुंज दिली. तसेच वीर खेमा नाईक यांच्या नेतृत्वाखाली मोठा लढा उभारला गेला. महादेव कोळ्यांच्या वाढत्या कारवाया लक्षात घेऊन शहाजान बादशहाने मोठी कुमक पाठवून स्वराज्यासाठी चाललेल्या मंडळींचा बंदोबस्त केला. हजारो महादेव कोळ्यांची धरपकड करून त्यांना दहशत बसवण्यासाठी जुन्नर येथे शिवनेरी किल्ल्यावर सोळाशे च्या वर महादेव कोळी सूर्यवंशी शीर छाटून श्रीकांत करण्यात आले व मुंडक्यांचा ढीग करून त्यावर चबुतरा बांधण्यात आला. यावेळी मुघलांचा सरदार अरणदुला खान होता. सामुदायिक कत्तलीच्या या चौथ्याऱ्याची नोंद इतिहासात काळा चौथरा म्हणून झाली. हे पण त्याचे सार्थ नाव महादेव कोळी चौथारा असा आहे. या चौथऱ्याचा उल्लेख इंग्रजांच्या मुंबई, ठाणे, पुणे या गॅजेटमध्ये सापडला आहे आणि म्हणून स्वराज्याच्या लढाईमध्ये आदिवासी बांधवांचे फार मोठे बलिदान आणि योगदान राहिले आहे.सर्जेसाठी आपल्या प्राण्याची आहुती देणाऱ्या या शूरवीरांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी, त्यांना अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील सर्व कानोकोपऱ्यातील महादेव कोळी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या थोर वीरांना अभिवादन केले.याप्रसंगी मनोगते व्यक्त करताना लेंबे मॅडम माळीन, कचरे मॅडम अकोले, भांगरे साहेब मोखाडा, पवार साहेब नंदुरबार यांनी मनोगतातून शूर क्रांतीकारकांची माहिती समाज बांधवांना सांगितली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने श्री. तुळशीराम भोईर, श्री .विठ्ठल भोईर, श्री. दत्ताभाऊ गवारी, श्री. काळुदादा शेळकंदे, सरपंच महादू निर्मळ, मंगेश आढारी ,संतोष तळपे, शुभम उंडे, चैत्राली केंगले ,सीमा रघतवान, शुभम भवारी ,संदीप भाऊ लोटे, मनोहर कारोटे, मोहन नाडेकर, अंकुश दाते, सुनील वीर्णक,अंकुश गवारी, प्राध्यापक संजय मेमाणे, सागर मुठे, यांसह विविध आदिवासी नेते, सामाजिक कार्यकर्ते, विविध सरपंच उपस्थित होते. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्यातील विविध संघटनांनी अनमोल सहकार्य केले. त्यामध्ये सह्याद्री आदिवासी कोळी महादेव जमात संघटना, अंबरनाथ महादेव कोळी समाज संघटना, कर्जत एक आदिवासी लाख आदिवासी संघटना, पालघर यांसह विविध अन्नदाते, दानशूर समाजबांधव यांनी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. मोहन लांडे यांनी केले, तर आभार सुभाष मोहरे यांनी मानले.




दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# शिक्षक संपूर्ण पिढी घडवण्याचे कार्य करतात

## डॉ. रेवती श्रीनिवासन यांचे कार्य ठाण्यासाठी अभिमानास्पद : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■ भिवंडी (दै. संध्या)

शिक्षणात सर्वसमावेशकता आणून प्रत्येक विद्यार्थ्याला वर्गात आपलेपणा आणि सन्मानाची वागणूक मिळणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन ठाणे येथील 'सत्कार रेसिडेन्सी' येथे आयोजित पुस्तक प्रकाशन सोहळ्यात करण्यात आले. डॉ. रेवती श्रीनिवासन लिखित "Creating Classrooms Where Every Child Belongs" या पुस्तकाचा सोहळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी खासदार नरेश म्हस्के, माजी खासदार आनंद परांजपे, उपप्रादेशिक अधिकारी हेमांगिनी पाटील तसेच शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री म्हणाले की,शिक्षण क्षेत्रातील डॉ. रेवती श्रीनिवासन यांच्या योगदानाचे कौतुक केले. "विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रत्येकाला समान संधी मिळण्यासाठी वर्गातील वातावरण सर्वसमावेशक असणे गरजेचे आहे. हे पुस्तक शिक्षक, पालक आणि शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांसाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरेल," असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

डॉ.रेवती श्रीनिवासन यांच्या कार्याचा गौरव गेल्या तीन दशकांपासून शिक्षण क्षेत्रात अविरत योगदान देणाऱ्या डॉ. रेवती श्रीनिवासन यांनी सर्वसामान्य मुलांसोबतच विशेष गरजा असणाऱ्या (Special Needs), ग्रामीण व वंचित घटकांतील मुलांसाठी थेरपी सेंटर्स आणि विशेष उपक्रम राबवून त्यांना मुख्य प्रवाहात आणले. लंडनच्या 'हाऊस ऑफ लॉर्ड्स'मध्ये झालेला त्यांचा सन्मान आणि त्यांनी निर्माण केलेला शैक्षणिक वारसा संपूर्ण ठाणेकरांसाठी अभिमानास्पद आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्यक्रमादरम्यान धर्मवीर आनंद दिघे यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा देत, शाळेतील प्रवेश प्रक्रियेसाठी सामान्य कार्यकर्त्यांच्या व पालकांच्या विनंत्या घेऊन प्रत्यक्ष शाळेत येण्याच्या जुन्या प्रसंगांचे स्मरणही यावेळी करण्यात आले. यावेळी डॉ. रेवती श्रीनिवासन यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.


त्या म्हणाल्या की, शिक्षणाचा खरा उद्देश केवळ साक्षरता नसून, प्रत्येक बालकाच्या क्षमतेचा शोध घेऊन त्याला समाजात आत्मसन्मानाने जगण्याचे बळ देणे हा आहे. सर्वसामान्य विद्यार्थ्यांसोबतच विशेष गरजा असणारी मुले (Special Needs Children), ग्रामीण आणि सामाजिक - आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांतील मुले यांच्यासाठी परिश्रम घेणे आवश्यक आहे. विशेष थेरपी सेंटर्स आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून या मुलांना मुख्य प्रवाहात आणून त्यांच्या आयुष्याला नवी दिशा दिली पाहिजे.

# स्मार्ट मीटरची छेडछाड अंगलट

## भोसरीतील १९ वीजचोरांवर महावितरणकडून गुन्हे

■ पुणे (दै. संध्या)

स्मार्ट मीटरमध्ये छेडछाड करून वीजचोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर महावितरणने थेट फौजदारी कारवाईचा बडगा उगारला आहे. भोसरी विभागातील भोसरी, आकुर्डी आणि प्राधिकरण (देयके व महसूल) उपविभागात स्मार्ट मीटरचे सील तोडून 'सीटी बायपास'द्वारे मीटरची गती कमी करून वीजचोरी केल्याची १९ प्रकरणे उघडकीस आली आहेत. यापैकी ९ प्रकरणांत गुन्हे दाखल करून १२ लाख ४१ हजार रुपयांची दंडात्मक आकारणी करण्यात आली आहे. उर्वरित १० प्रकरणांतही दंडाची आकारणी करून वीजचोरीचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. विशेष म्हणजे, वीजचोरी करण्यासाठी मीटरमध्ये केलेली चलाखी महावितरणच्या 'स्मार्ट' तपासणी यंत्रणेनेच हेरली. मीटरचे सील तोडणे, कव्हर उघडणे तसेच सीटी प्रणालीला बगल देऊन वीज वापर कमी दाखविण्याचा प्रयत्न तपासणीमध्ये उघडकीस आला. त्यामुळे स्मार्ट मीटरला चकवा देण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर आता थेट फौजदारी कारवाई होत आहे. चाऱ्होली येथील 'शेतकरी फॅमिली रेस्टॉरंट' या व्यावसायिक वीज ग्राहकाच्या ठिकाणीही गंभीर स्वरूपाची अनियमितता आढळून आली. या ठिकाणी मीटरमध्ये छेडछाड करण्यासाठी रिमोट उपकरण बसविल्याचे तपासणीदरम्यान निदर्शनास आले. स्मार्ट मीटरच्या कार्यप्रणालीत हस्तक्षेप करून वीजचोरी करण्याचा हा गंभीर प्रकार महावितरणच्या तपासणीमध्ये पकडला गेला. वीजचोरी करण्यासाठी मीटरमध्ये छेडछाड करणे, सील तोडणे किंवा सीटी बायपास करण्याचा प्रयत्न करणे हा गंभीर प्रकार असून, अशा प्रकारांविरुद्ध भारतीय विद्युत अधिनियम २००३ अंतर्गत विविध कलमांद्वारे दंडात्मक आकारणीसोबतच फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कठोर भूमिका महावितरणने घेतली आहे.




■ मीटरचे सील तोडून गती कमी करण्याचा प्रयत्न

■ ९ प्रकरणांत १२.४१ लाखांची दंडात्मक आकारणी; उर्वरित १० प्रकरणांत कारवाई सुरू

# परराज्यातील लॉटरीचे संकट : विलास सातार्डेकर



## महाराष्ट्र राज्य हा बोगस लॉटरीचा छापखाना बनला आहे काय?

पोलीसांनाही न जुमानता खोटी-नाटी परवानगी दाखवून फसवणूक करणारे दलाल व वितरक हे कितीकाळ ग्राहक आणि विक्रेत्यांना वेठीस धरणार? बोगस कंपन्या, एजंट आणि दलाल यांच्यापुढे आपण शरणागती पत्करणार काय? कोट्यवधी रुपयांच्या बक्षिसांची तिकिटे महाराष्ट्रात विकून हा पैसा असाच परराज्यात जाणार काय? हे प्रश्न उपस्थित करून लॉटरी विक्रेत्यांनी आता सावध राहावे. तसेच, या परप्रांतीय लॉटरी ठेकेदारांना न घाबरता पारदर्शक पद्धतीने व्यवसाय करावा, असेही विलास सातार्डेकर यांनी स्पष्ट केले.

■ मुंबई (दै. संध्या)

सणासुदीच्या पार्श्वभूमीवर परप्रांतीय बोगस लॉटरीचा लवकरच सुळसुळाट होणार असून, लॉटरीचे ग्राहक व विक्रेते यांनी सावध राहावे; अन्यथा फसवणूक होण्याचे भय आहे, असा इशारा महाराष्ट्र राज्य लॉटरी विक्रेता संघटनेचे संस्थापक-अध्यक्ष श्री. विलास कृ. सातार्डेकर यांनी दिला आहे.

लॉटरी विक्रेता संघटनेच्या राज्यव्यापी पदाधिकारी बैठकीनंतर संघटनेचे अध्यक्ष विलास सातार्डेकर पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, येत्या काळात लॉटरी उद्योगापुढे संकट म्हणून उभ्या ठाकणाऱ्या विविध घटनांकडे त्यांनी लक्ष वेधले असून, लॉटरीचे ग्राहक व विक्रेते यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. गणेशोत्सव, दिवाळी, नवरात्र, दसरा या सणांच्या निमित्ताने विविध प्रचारमाध्यमांतून वारेमाप जाहिराती ग्राहकांपुढे येत आहेत. अशा जाहिरातींवर कोट्यवधी रुपयांचा खर्च करून लॉटरीच्या ग्राहकांना आकर्षित करण्याचा पद्धतशीर प्रयत्न सुरू आहे. मात्र, हे परप्रांतीय दलाल, मुख्य वितरक व वितरक यांचे षड्यंत्र असून, त्यातून ग्राहकांची फसवणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्राहकांनी खबरदारी घेणे ही काळाची गरज असल्याचे सातार्डेकर यांनी स्पष्ट केले.

पाचशे रुपयांच्या तिकिटावर १ कोटी २५ लाख रुपये, ४०० रुपयांच्या तिकिटावर १ कोटी २१ लाख रुपये, ३०० रुपयांच्या तिकिटावर १ कोटी ११ लाख रुपये, २५० रुपयांच्या तिकिटावर १ कोटी रुपये, ५०० रुपयांच्या तिकिटावर ३ कोटी रुपये, तसेच २५० रुपयांच्या तिकिटावर १ कोटी ५० लाख रुपये अशा भरमसाट बक्षिसांच्या रकमेची जाहिरात करण्यात येत आहे. मात्र, हे सर्व फसवे दावे आणि फसव्या बक्षिसांच्या रकमा आहेत. या चक्रात ग्राहकांनी तसेच विक्रेत्यांनीही फसू नये, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. महाराष्ट्र राज्यात ऑनलाइन लॉटरीला बंदी असूनही, कोणतीही परवानगी नसताना ऑनलाइन पेपर लॉटरी खुलेआम राज्यभर सुरू आहे. काही ठिकाणी पेपर लॉटरी थेट पोस्टाने तसेच कुरिअरद्वारे ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. राज्य सरकार तसेच पोलीस खात्याला न जुमानता हा आर्थिक व्यवहार सुरू असल्याकडेही लॉटरी विक्रेता संघटनेने लक्ष वेधले आहे.

परप्रांतीय खलनायक दलाल विक्रेत्यांना खोटी आश्वासने व आमिषे दाखवून परप्रांतीय बोगस लॉटरी विक्रीसाठी विविध मार्गांनी दबाव आणत आहेत. मात्र, अनधिकृत असलेली ही लॉटरीची तिकिटे विक्रेत्यांनी अमान्य करावीत. काही ठिकाणी या बोगस लॉटरीचे अड्डे मटक्याप्रमाणे सुरू झाले आहेत. त्यामुळे अधिकृत राज्य लॉटरीची बदनामी होताना दिसत आहे. दमदाटी करून लॉटरीची तिकिटे विक्री करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या गुंडांविरोधात विक्रेत्यांनी थेट लॉटरी संघटनेशी संपर्क साधावा आणि लॉटरी उद्योगाची प्रतिष्ठा व परंपरा शाबूत ठेवावी, असे कळकळीचे आवाहन विलास सातार्डेकर यांनी विक्रेत्यांना केले.

# जनकल्याण आदिवासी सामाजिक संस्थेच्यावतीने अन्न धान्य वाटप

■ मुंबई (दै. संध्या)

भिवंडी भिनार येथील जनकल्याण आदिवासी सामाजिक संस्था आणि डिग्निटी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने भिवंडी तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक बांधिलकी जपत मोफत अन्नधान्य किट वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. जनकल्याण आदिवासी सामाजिक संस्थेचे संस्थापक श्री महादेव घाटाळ साहेब यांच्या माध्यमातून, आणि डिग्निटी फाउंडेशनच्या सहकार्याने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ज्येष्ठ नागरिकांना विविध जीवनावश्यक अन्नधान्याचा समावेश असलेले किट मोफत वितरित करण्यात आले या उपक्रमाला ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शेकडोच्या संख्येने पुरुष व महिला ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. तसेच कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती गरजू व ज्येष्ठ नागरिकांना आधार देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवर व नागरिकांनी कौतुक केले समाजातील गरजू घटकांसाठी अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला यावेळी उपस्थित मान्यवर विजेंद्रकुमार शर्मा उद्योगपती, श्रमिक मोर्चा ठाणे अध्यक्ष मंदार घाणेकर ठाणे,आदिम आधार आदिवासी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित ठाणे उपाध्यक्ष, सुनील झळके, सचिव जयराम पाटील खजिनदार अशोक भेकरे व सुरेश जाधव संचालक ,दिलीप चव्हाण डिग्निटी फाऊंडेशन श्री वीरेंद्र मैसर डॉ.प्रियंका मोरे डॉ विशाल गुप्ता धर्मा भारती, श्री बुधन गवारी व इतर सर्व पदाधिकारी उपस्थित अन्न धान्य किट चे वितरण करण्यात आले.




# कॉर्फबॉल प्रीमियर लीग साठी टी.सी. कॉलेजच्या आठ खेळाडूंची निवड

■ मुंबई (दै. संध्या)

कॉर्फबॉल फेडरेशन ऑफ इंडिया आणि स्पोर्टी भारत इंटरटेनमेन्ट प्रा.ली. यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्ली येथील त्यागराज इनडोअर स्टेडियम येथे दि. १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर, २०२६ दरम्यान होणाऱ्या भारतातील पहिल्या कॉर्फबॉल प्रीमियर लीग साठी निवडण्यात आलेल्या खेळाडूंची घोषणा कॉर्फबॉल फेडरेशन ऑफ इंडिया तर्फे नुकतीच करण्यात आली. आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय खेळाडूंचा या स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे. एकूण ८ संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. एकाच संघात पुरुष व महिला एकत्रित खेळतात हे या खेळाचे वैशिष्टय आहे. स्त्री पुरुष समानतेला चालना देणारा हा खेळ संपूर्ण जगात खेळला जातो. युरोप खंडात हा खेळ खूप प्रसिद्ध असून आशिया खंडातही मोठ्या प्रमाणावर खेळला जातो. या खेळाच्या आशियाई व जागतिक स्पर्धा खेळल्या जातात. भारतात पहिल्यांदाच होणाऱ्या या कॉर्फबॉल प्रीमियर लीगसाठी आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय स्तरावरील अनेक खेळाडूंमधून निवड झाल्याचे कॉर्फबॉल फेडरेशन ऑफ इंडिया तर्फे पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. यामध्ये किरण भोसले, पियुषा लोणकर, श्वेता वाघ, निशा पांडिया, अभिषेक माने, समीर भोसले, हर्ष मोहिते व प्रणव पोमने यांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत झेप घेणाऱ्या सर्व खेळाडूंना प्रा.डॉ.गौतम जाधव व प्रा.अशोक देवकर यांनी मार्गदर्शन केले . या खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी, सर्व सदस्य, मा.प्राचार्य डॉ.अविनाश जगताप, मा.उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन -केले आहे.

# भाषा एकमेकांना जोडण्याचे काम करते, तोडण्याचे नाही : देवेंद्र भुजबळ

■ मुंबई (दै. संध्या)

भाषेची महिती जोडण्याची आहे.मध्यंतरी भाषेवरून वादंग माजले.परंतू भाषा एकमेकांना जोडण्याचे काम करते, तोडण्याचे नाही असे ठोस प्रतिपादन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे माजी संचालक, ज्येष्ठ साहित्यिक, पत्रकार व प्रकाशक देवेंद्र भुजबळ यांनी रविवारी व्यक्त केले. शारदा प्रकाशनच्या वतीने कवयित्री सुरेखा पाटील व कवयित्री प्रतिभा बिर्जे यांच्या तरंग हिंदी व मराठी काव्यसंग्रहाचे प्रकाशन देवेंद्र भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले.त्या प्रसंगी ते बोलत होते.कार्यक्रमास पत्रकार व कवी मंगेश विश्वासराव,कवयित्री प्रा.प्रतिभा राणे, प्रकाशक प्रा.डॉ.संतोष राणे मान्यवर उपस्थित होते.या प्रसंगी सुप्रसिद्ध निवेदिका किर्ती पाटसकर यांना कवयित्री प्रतिभा बिर्जे यांच्या स्मरणार्थ व शारदा प्रकाशनच्या वतीने स्वरप्रतिभा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कवयित्री सुरेखा पाटील व कवयित्री प्रतिभा बिर्जे यांनी कविता स्वतंत्रपणे लिहिलेल्या आहेत.या कविता अनुवादित केलेल्या आहेत असे वाटत नाहीत.यातून सुरेखा पाटील यांच्या मनस्वी पणा भावना व्यक्त होतात.त्यांच्या मराठी कवितांतून भावानंद निर्माण झालेला आहे.असे देवेंद्र भुजबळ यांनी अधोरेखित केले.पत्रकार मंगेश विश्वासराव यांनी हा कौटुंबिक सोहळा आहे असे सांगून प्रथम मला या दोघी कवयित्री मैत्रिणी वाटल्या पण नंतर कळले की त्या सख्या बहिणी आहेत.माणूस सांगण्याचे काम कविता करते.कविता म्हणजे गाणे.जात आली की कविता हरते.संत कबीराला आपण विसरलो त्यांना मराठीत कोणी लिहिले नाही अशी खंत विश्वासराव यांनी व्यक्त केली.या पुस्तकाची निर्मिती करण्यात ७ ते ८वर्ष गेली.कविता सुरेल असेल तर नाती सुरेल असावी लागतात. हे या कुटुंबाच्या काव्य शरीरात रंगलय. शुध्द रक्त करणारे हे कुटुंब आहे.आयुष्याचे नवे तरंग या पुस्तकातून शिकायला मिळेल अशा सद्भावना प्रकाशक प्रा.डॉ.संतोष राणे यांनी व्यक्त केल्या.माझी मैत्रिण सुरेखा चांगली लिहिते.तिचे मराठीतील शब्द हिंदीत पहिल्यांदा ऐकण्याचा वेगळाच आनंद असतो. तिची प्रत्येक कविता वाचली की त्यात नवीन मिळते. अश्या आठवणींना प्रा.प्रतिभा सराफ यांनी उजाळा दिला.याप्रसंगी दोन्ही कवयित्रींच्या काव्य वाचनाचा आविष्कार सुप्रसिद्ध निवेदक दिनेश अडावदकर आणि लंडनहून खास आलेल्या सुरेखा पाटील यांच्या कन्या ऋचा पाटील रायकर यांनी खुमासदारपणे सादर करून रसिकांची मने जिंकली.सदर काव्यसंग्रह सुरेखा पाटील यांच्या धाकट्या भगिनी शुभांगी प्रधान यांना अर्पण करण्यात आला आहे.आभार प्रर्दशन सुरेखा पाटील यांनी आपल्या मनोगतातून केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लंडनहून आलेले अंकुर रायकर व पाटील कुटुंबानी बरीच मेहनत घेतली होती.




# थोडक्यात पण महत्वाचे

महाराष्ट्र शासन

## बालकांमधील टीबी तपासणीला मिळणार गती

मुंबई (दैनिक संध्या) : कुपोषित बालकांमध्ये क्षयरोगाचे (टीबी) वेळीच निदान होऊन त्यांना योग्य उपचार मिळावेत, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशांनुसार सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पोषण पुनर्वसन केंद्रांमध्ये (NRC) टीबी तपासणीची कार्यपद्धती अधिक बळकट करण्यात आली आहे. कुपोषणामागील एक महत्त्वाचा घटक असलेल्या बाल टीबीचे निदान, उपचार आणि प्रतिबंध यासाठी राज्यात विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. मुख्यमंत्री सचिवालयाच्या २ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या निर्देशांनुसार आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनात आरोग्य विभाग महिला आणि बालकांच्या आरोग्याची विविध उपक्रमाद्वारे काळजी घेत आहे. पोषण पुनर्वसन केंद्रांमध्ये दाखल होणाऱ्या बालकांची टीबी तपासणी, निदान व उपचारासाठी मानक कार्यपद्धती, प्रशिक्षण, निदान सुविधा आणि औषधांचा पुरवठा सुनिश्चित करण्यात आला आहे. या कार्यपद्धतीनुसार बालकांची लक्षणे व टीबी रुग्णाच्या संपर्काचा इतिहास तपासला जातो. आवश्यकतेनुसार नमुना संकलन, सीबी-नॅट/ ट्रूनॅट तपासणी आणि छातीचा एक्स-रे यांसारख्या निदान सुविधांशी बालकांना जोडण्यात आले आहे.

## शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी मुदतवाढ

मुंबई (दैनिक संध्या) : इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक व बिगर व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी जिल्हानिहाय शासकीय वसतिगृह सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत मुंबई शहर जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह प्रवेश अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली असून, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांसाठी इमारत क्रमांक व्हि पहिला मजला प्लॉट नंबर ७ सेक्टर १९ ब वाशी नवी मुंबई वाशी येथे मोफत मुलांचे शासकीय वसतिगृह सुरू करण्यात आले आहे. या वसतिगृह योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना मोफत निवासासह भोजन भत्ता व निर्वाह भत्ता देण्यात येणार आहे.

## स्वयं योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई (दैनिक संध्या) : मुंबई शहर जिल्ह्यातील इतर मागास वर्ग (ओबीसी), विमुक्त जाती व भटक्या जमाती (व्हीजेएनटी) तसेच विशेष मागास प्रवर्गातील (एसबीसी) उच्च शिक्षण घेणाऱ्या, मात्र शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या पात्र विद्यार्थ्यांसाठी 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना' राबविण्यात येत आहे. तसेच भटक्या जमाती-क (एनटी-सी) प्रवर्गातील धनगर समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयं योजना' राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील १२ वी नंतर पदवी, पदव्युत्तर तसेच व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांसाठी या योजनेंतर्गत ऑनलाइन अर्ज करण्यासाठी पोर्टल सुरू करण्यात आले आहे. पात्र विद्यार्थ्यांनी दि. १ सप्टेंबर २०२६ ते दि. १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत ऑनलाइन अर्ज सादर करावेत. यासाठी विद्यार्थ्यांनी https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज भरावा. ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रत व आवश्यक कागदपत्रांचा एक संच सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, मुंबई शहर, नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, आर. सी. मार्ग, चेंबूर, मुंबई - ४०००७१ येथे जमा करावा. तरी महाविद्यालय स्तरावर या योजनांसाठी पात्र असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज भरून या योजनांचा लाभ घ्यावा, तसेच महाविद्यालयांनी याबाबत पात्र विद्यार्थ्यांना आवश्यक माहिती देऊन त्यांना योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

# ६२ गुणवंत शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव

## महात्मा ज्योतिबा फुले ज्ञानयात्री गुणवंत शिक्षक पुरस्कार' सोहळा उत्साहात संपन्न

■ सासवड (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने, समर्पित सेवाभावाने आणि उल्लेखनीय कार्याने योगदान देणाऱ्या गुणवंत मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव करणारा 'महात्मा ज्योतिबा फुले ज्ञानयात्री गुणवंत मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार' सोहळा शिक्षक दिनाचे औचित्य साधून शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी आचार्य अत्रे सांस्कृतिक भवन, सासवड येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. एन.जी.आर. असोसिएट्स व मोशन एज्युकेशन इन्स्टिट्यूट, पुणे यांच्या वतीने आयोजित या सोहळ्यात सासवड नगरपालिकेच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, सत्यजित बडे (IAS), आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव व राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, गुरुकुल अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य संदिप टिळेकर,मुंबई उच्च न्यायालयाचे ॲड. सुभाष गुट्टे, सासवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष घोळवे, मोशन एज्युकेशन इन्स्टिट्यूट पुणे विभागाचे संचालक नितीन भुजबळ, गौरव शर्मा, एन.जी.आर. असोसिएट्स पुणेचे अध्यक्ष राज लहाने, सचिन सानप, शिक्षक परिषदेचे अध्यक्ष विजय पिलाने, कार्यवाहक शिवहार लहाने,पुरंदर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष दिलीप नेवसे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक संघाचे प्रवक्ते वसंतराव ताकवले, पुरंदर तालुका माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष दत्तात्रय रोकडे,सचिन धनवट,प्राचार्य इस्माईल सय्यद यांच्या हस्ते गुणवंतांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी शिक्षण, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांसह पुरंदर तालुक्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी राजेंद्र कांबळे, इस्माईल सय्यद, विजयकुमार हाके, अभिजीत टकले, प्रदीप दुर्गाडे, सुनील वाघ, पांडुरंग दुर्गाडे, रामदास जगताप, निर्मला माने, युवराज घोळवे, हसीना आतार, कमलाकर कापडणे, दादासाहेब साठे, अशोक चव्हाण, अनुराधा पोरे, बाळासाहेब झगडे, कोमल झगडे, भाविक सी. एस., पुरुषोत्तम रोटे, निर्मला उरसळ आणि प्रिया गायकवाड, दत्तात्रय रोकडे, श्रीपाद तुंगार, हनुमंत निगडे, प्रल्हाद गिरमे, गणेश पावरा, संदीप गोरे, प्रमोद जाधव, जितेंद्र आवताडे, प्रशांत माकर, अतुल गायकवाड, योगेश घोडके, नितीन कोलते, किशोर जगताप, पांडुरंग कुंभार, संजय गोसावी, प्रशांत धेंडे, अप्पासाहेब बनकर, सचिन निकुंभ, महेंद्र भोसले, दीपक पाटील आणि संजय माळी,अश्विनी काळे, रुपाली घोलप, वर्षा बोरावके, वर्षा माने, वर्षा देसाई, प्रज्ञा वाघमारे, कावेरी भोसले, सविता गिरी, सारिका सातव, संगीता पापळ, अपर्णा राजमाने,संगीता रुपनवर आणि रुचिरा गार्डी, सिद्राम कांबळे, राम भोसले, संभाजी लोंढे, धुळदेव हनुमंत पवार, सुषमा भोसले आणि संजय गायकवाड यांचाही लिपिक, सेवक व ग्रंथपाल म्हणून गौरव करण्यात आला. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या 'शिक्षणातून समाजपरिवर्तन' या विचारधारेचा जागर करीत गुणवंतांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या या उपक्रमामुळे पुरंदर तालुक्यातील शिक्षण क्षेत्राला नवी ऊर्जा, प्रेरणा आणि सकारात्मक दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. पुरस्कारप्राप्त गुणवंतांच्या चेहऱ्यावर समाधान व आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवर, पुरस्कारप्राप्त गुणवंत तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. पुरस्कार सोहळ्याच्या यशस्वितेसाठी शिवहार लहाने – कार्यवाह, शिक्षक परिषद पुणे जिल्हा,विजय पिलाने,अध्यक्ष, शिक्षक परिषद पुरंदर तालुका,दीपक भोसले – कार्यवाह,दत्तात्रय गायकवाड – उपाध्यक्ष, प्रशांत बेंगळे – उपाध्यक्ष, बिबीशन देडे – उपाध्यक्ष, विकास भोसले – कार्याध्यक्ष, जितेंद्र कोकणी – संघटन मंत्री, स्वाती कामथे – महिला आघाडी प्रमुख,किशोर जगताप – संघटक, तसेच दत्तात्रय बनकर – संघटन मंत्री,सचिन धनवट यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर मधुसूदन जगताप यांनी केले.आभार दिपक भोसले यांनी मानले.

### 'गुणवंतांचा सन्मान म्हणजे प्रेरणेचा जागर'

"शिक्षक हा समाजाच्या जडणघडणीतील महत्त्वाचा घटक आहे. ज्ञानदानाबरोबरच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला आकार देणे आणि समाजाला दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिक्षक करीत असतात. अशा कर्तृत्ववान शिक्षकांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा सन्मान करणे हा निश्चितच प्रेरणादायी उपक्रम आहे," असे गौरवोद्गार उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.




## थोडक्यात पण महत्वाचे




### भरत गिते यांची महंत न्यायाचार्य नामदेव शास्त्री महाराजांची सदिच्छा भेट

पुणे/भगवानगड: दैनिक संध्या

उद्योगविश्वात आपल्या कर्तृत्वाची स्वतंत्र ओळख निर्माण करणारे आणि 'ॲल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' म्हणून परिचित असलेले तौरल इंडिया ग्रुपचे संस्थापक भरत गिते यांनी नुकतीच भगवानगड येथे गडाचे मठाधिपती महंत न्यायाचार्य नामदेव शास्त्री महाराज यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी उद्योग आणि व्यवसायासोबतच शिक्षण, युवकांचे भविष्य, सामाजिक बांधिलकी, अध्यात्म आणि संस्कार अशा विविध विषयांवर सखोल व प्रेरणादायी चर्चा झाली. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी उद्योगाने निर्माण केलेल्या संधी आणि अध्यात्माने दिलेले संस्कार यांची सांगड घालण्याची गरज असल्याचे मत या चर्चेतून अधोरेखित झाले. या भेटीदरम्यान भगवानगडावर साकारत असलेल्या भारतातील भव्य श्री संत ज्ञानेश्वर माऊली मंदिराच्या सुरू असलेल्या कामाची माहिती महंत नामदेव शास्त्री यांनी गिते यांना दिली. मंदिराच्या भव्य संकल्पनेपासून सुरू असलेल्या कामापर्यंतची विविध माहिती त्यांनी यावेळी सांगितली. भगवानगड ही केवळ अध्यात्माची भूमी नसून शिक्षण, संस्कार आणि सामाजिक परिवर्तनाचे केंद्र म्हणूनही कार्यरत आहे. गडावर विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा अभ्यासिकेची, तसेच वारकरी संप्रदायाचे शिक्षण घेत असलेल्या संस्थेतील कीर्तनकार विद्यार्थ्यांची आणि त्यांच्या शैक्षणिक वाटचालीबाबत गिते यांनी जाणून घेतले. यावेळी नामदेव शास्त्री महाराज यांनी भरत गिते यांचा श्री संत भगवानबाबा महाराजांची प्रतिमा भेट देऊन सन्मान केला. भगवानबाबांच्या विचारांची आणि कार्याची प्रेरणा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हा क्षण विशेष ठरला. या भेटीप्रसंगी भगवानगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री, तौरल इंडिया कंपनीचे व्यवस्थापक निलेश जायभाये, लेट्सअप मराठीचे इंजि. जनार्धन जायभाये, उद्योजक केशव नागरगोजे यांच्यासह अनेक भक्तगण उपस्थित होते.

## ज्येष्ठ विधितज्ञ ॲड. रामकृष्ण गोविंद राणे यांना जीवनगौरव पुरस्कार

### शिक्षक दिनाचे औचित्य साधून पुणे बार असोसिएशनचा विशेष उपक्रम

■ जेजुरी (दै. संध्या)

शिक्षक दिनाचे औचित्य साधून पुणे बार असोसिएशनच्या वतीने पुणे जिल्हा न्यायालयातील ऐतिहासिक अशोक हॉल येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात ज्येष्ठ विधितज्ञ, पुणे बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. रामकृष्ण गोविंद राणे तथा ॲड. आर. जी. राणे यांना त्यांच्या प्रदीर्घ, उल्लेखनीय व प्रेरणादायी विधीसेवेबद्दल जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन पुणे बार असोसिएशनचे विद्यमान अध्यक्ष ॲड. राम भुजबळ यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करताना ॲड. आर. जी. राणे यांच्या प्रदीर्घ विधीसेवेचा गौरव केला आणि त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

या सन्मान सोहळ्यास बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा चे माजी अध्यक्ष ॲड. हर्षदजी निंबाळकर, तसेच बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा चे माजी चेअरमन व विद्यमान सदस्य ज्येष्ठ विधितज्ञ ॲड. पठाण उपस्थित होते. या प्रसंगी पुणे बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. पांडुरंग थोरवे यांनी 'मोजणीचे कायदेशीर महत्त्व, मोजणीचा इतिहास व संबंधित शासन निर्णय आणि शासकीय परिपत्रके' या विषयावर सखोल व अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. ॲड. थोरवे यांनी सिंधू संस्कृतीपासून आजतागायत मोजणी व्यवस्थेचा ऐतिहासिक प्रवास, मोजणीसंदर्भातील कायदेशीर तरतुदी, महसूल कायदे, विविध शासन निर्णय व परिपत्रके तसेच न्यायालयीन कामकाजामध्ये मोजणीचे असलेले महत्त्व यावर प्रकाश टाकला. तसेच सध्याची मोजणी व्यवस्था आणि मोजणीसंदर्भातील अद्ययावत शासन निर्णय याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास पुणे बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड. कांतराम नप्ते, उपाध्यक्ष ॲड. प्रताप मोरे, महिला उपाध्यक्षा ॲड. प्रीती सिंग परदेशी, सचिव ॲड. सम्राट जांभूळकर, सचिव ॲड. सुहास पोळ आणि खजिनदार ॲड. पूजा पवार यांच्यासह अनेक ज्येष्ठ विधिज्ञ व मोठ्या संख्येने वकील उपस्थित होते.




### मोजणी विषयावर ॲड. पांडुरंग थोरवे यांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन

## डाळिंबास २० किलोच्या एका क्रेटला मिळाला ६ हजार रुपये बाजारभाव

■ आळेफाटा (दै. संध्या)

आळेफाटा बाजार समितीत सोमवार दि. ७ रोजी डाळींबाच्या २० किलोच्या एका क्रेटला मिळाला ६ हजार रुपयांचा भाव मिळाला आहे. अशी माहिती सभापती संजय काळे, उपसभापती निवृत्ती काळे, संचालक प्रितम काळे,सचिव रुपेश कवडे, व्यवस्थापक सतीष म्हस्करे यांनी दिली. जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीत असणाऱ्या आळेफाटा येथील उपबाजारात सोमवारी झालेल्या बाजार लिलावात वीस किलोच्या एका क्रेटला ६ हजार रुपयांचा भाव मिळाला आहे. त्या खालोखाल त्याच्या दुसऱ्या डाळिंबाच्या एका क्रेटला ५ हजार रुपयांचा भाव मिळाला आहे. तर तिसऱ्या क्रमांकाच्या डाळींबाच्या एका क्रेट ला ३ हजार ५०० रुपयांचा भाव मिळाला. व चार नंबर क्रमांकाच्या एका क्रेटला २ हजार १०० रुपयांचा बाजारभाव मिळाला व पाच नंबर च्या एका क्रेटला १ हजार ४०० रुपयांचा बाजार भाव मिळाला. तसेच बाजार समितीत सुमारे ५ हजार क्रेटची आवक झालेली होती. गेल्या दिवसापासून डाळिंबाचा बाजारभाव स्थिर असल्याची माहिती डाळिंब आडतदार प्रविण लेंडे, निशिकांत ढोमसे, विशाल कुटे, गिरीष भुजबळ, विजय कुऱ्हाडे, नामदेव भुजबळ, बारकु जाधव तसेच डाळिंब व्यापारी संदिप लोढा, शैलेश जाधव, पप्पु सरोदे, गणेश गडगे, अमर उर्किडे, सुभाष वाघोले, मियॉभाई तांबोळी, गोविंद गाडेकर, अमोल सरोदे, नारायण साबळे, मनोज शिंदे यांनी दिली.



## माहूर माध्यमिक विद्यालयात शिक्षकदिन व दहीहंडी उत्साहात संपन्न

■ काळदरी (दै. संध्या)

काळदरी येथील माहूर माध्यमिक विद्यालयात शिक्षकदिन आणि दहीहंडी कार्यक्रम मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात संपन्न झाला. शिक्षकदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत विविध उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे जिल्हा परिषदेचे मा. आदर्श जि. प. सदस्य बबुसाहेब माहूरकर उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे मानद सचिव व विश्वस्त प्रा. डॉ. महादेव हरुबाई साहेबराव जाधव होते. यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले, "आजच्या शिक्षकांनी केवळ विद्यार्थ्यांना विषयाचे ज्ञान देण्यापुरते मर्यादित न राहता लोकशिक्षकाची भूमिका बजावली पाहिजे. समाज घडविण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी शिक्षकांनी सतत प्रयत्नशील राहावे." कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन विद्येची देवता सरस्वती व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. मा. आमदार चंदुकाका जगताप यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षकदिनाचे महत्त्व सांगणारी मनोगते व्यक्त केली. तसेच शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करत विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यानंतर दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शिक्षक दिनानिमित्त इ १० वीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका घेऊन कार्य केले. यावेळी ऋणव जगताप याने मुख्याध्यापकाची भूमिका उत्तम प्रकारे संभाळली. विद्यार्थ्यांना एका दिवसात आलेला अनुभव आपल्या मनोगतातून व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत दहीहंडी फोडली. यावेळी विद्यार्थ्यांच्या उत्साहाला उधाण आले असून, विद्यालय परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमास माहूर गावच्या उपसरपंच सौ. मेघाताई जगताप, विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत पवार, रामप्रभू पेटकर, रामचंद्र जगताप, इंद्रभान पठारे, विकास राऊत, लता गायकवाड, स्नेहलता टिळेकर, श्रीकांत खोमणे, मंगल जगताप, श्रीकांत गव्हाणे, रामभाऊ कुंभार या सर्वांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

■ "आजच्या शिक्षकांनी लोकशिक्षकाची भूमिका बजावावी" — प्रा. डॉ. एम. एस. जाधव

# पुणे अहिल्यानगर वाहतूक कृती समितीची बैठक संपन्न

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

पुणे–नगर रोडवरील वाघोली, केसनंद व लोणिकंद परिसरात दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी पुणे नगर रोड वाघोली–केसनंद वाहतूक कृती समितीची बैठक नुकतीच बकोरी येथील गोविंद बाग बँकेटस् हॉल येथे संपन्न झाली. वाघोली, केसनंद, लोणिकंद परिसरातून दररोज मोठ्या प्रमाणावर नागरिक, विद्यार्थी, कामगार, व्यावसायिक व प्रवासी ये-जा करतात. मात्र या मार्गावर वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना तासनतास रस्त्यावर अडकून पडावे लागत आहे. त्यामुळे वेळ, इंधन व आर्थिक नुकसान होण्याबरोबरच रुग्णवाहिका, शालेय वाहने आणि अत्यावश्यक सेवांनाही मोठा अडथळा निर्माण होत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत माहिती सेवा समितीचे अध्यक्ष चंद्रकांत गोविंद वारघडे यांनी पुढाकार घेऊन वाहतूक कोंडीच्या प्रश्नासाठी एकत्रितपणे लढा देण्याच्या उद्देशाने पुणे नगर रोड वाघोली–केसनंद वाहतूक कृती समितीची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी व्हाट्सअप ग्रुप तयार करण्यात आला. अवघ्या दोन-तीन दिवसांत सुमारे २४० नागरिकांनी या ग्रुपमध्ये सहभाग घेतला. तसेच वाहतूक पोलीस व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांनाही या माध्यमातून जोडण्यात आले. या ग्रुपवर वाहतूक कोंडी होत असलेल्या ठिकाणांचे फोटो व व्हिडिओ नागरिकांकडून तत्काळ शेअर केले जाऊ लागले. त्यामुळे संबंधित विभागाला परिस्थितीची माहिती तातडीने मिळून काही ठिकाणी तत्काळ कारवाई करणे शक्य झाले आहे. मात्र केवळ तात्पुरती कारवाई न करता या परिसरातील वाहतूक कोंडीची कायमस्वरूपी समस्या सोडविणे आवश्यक असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. बैठकीत प्रमुख मागण्यांवर सविस्तर चर्चा



वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी खालील विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

- वाघोली, केसनंद व लोणिकंद परिसरातील प्रमुख चौकांचे रुंदीकरण व आवश्यक ठिकाणी चौक मोठे करणे.
- वाहतुकीच्या वाढत्या प्रमाणानुसार रस्त्यांचे रुंदीकरण करणे.
- उपलब्ध पर्यायी मार्ग तातडीने सुरू करून मुख्य रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी करणे.
- विरुद्ध दिशेने वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई करणे.
- रस्त्याच्या कडेला व वाहतुकीला अडथळा निर्माण करणारे महावितरणचे विद्युत पोल आवश्यक त्या ठिकाणी हलविणे.
- पुणे–नगर रोडवरील खड्डे तातडीने बुजवून रस्ता वाहतुकीस योग्य करणे.
- प्रवासी वाहने रस्त्यावर अनधिकृतपणे थांबवून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करणे.
- लक्झरी बस व इतर मोठी वाहने रस्त्यावर थांबून प्रवासी घेत असल्याने निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीवर कठोर कारवाई करणे.
- वाहतूक नियमनासाठी आवश्यक त्या ठिकाणी बॅरिकेडिंग, सिग्नल व्यवस्था व वाहतूक नियोजन करणे.
- सकाळी व सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत वाहतूक पोलिसांची प्रभावी नियुक्ती करणे.
- अपघातप्रवण व वाहतूक कोंडीची ठिकाणे निश्चित करून त्या ठिकाणी कायमस्वरूपी उपाययोजना करणे.
- निवेदन देऊनही कारवाई न झाल्यास आंदोलन

वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर संबंधित विभाग, प्रशासन व लोकप्रतिनिधींना कृती समितीच्या माध्यमातून सविस्तर निवेदन देण्यात येणार आहे. या निवेदनाद्वारे तातडीच्या तसेच दीर्घकालीन उपाययोजना करण्याची मागणी करण्यात येणार आहे. मात्र निवेदन देऊनही ठोस कार्यवाही झाली नाही, तर नागरिकांच्या सहकार्याने उपोषण, आंदोलन व लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. नागरिकांना दररोज होणाऱ्या त्रासाची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली. गणेश पूजनाने बैठकीस सुरुवात

बैठकीच्या प्रारंभी जनसेवक संपत आबा गाडे यांच्या हस्ते श्री गणेशाची पूजा करून बैठकीस सुरुवात करण्यात आली. या बैठकीस गेल्या अनेक वर्षांपासून नगर रोडवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी स्वतः रस्त्यावर तासनतास उभे राहून वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करणारे जनसेवक संपत आबा गाडे, वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर नागरिकांना एकत्र करून कृती समितीच्या माध्यमातून लढा देण्याचा निर्णय घेणारे माहिती सेवा समितीचे अध्यक्ष चंद्रकांत वारघडे, माजी पंचायत समिती सदस्य सुरेश बापू सातव, केसनंदचे सरपंच विशाल हरगुडे, माजी सरपंच दत्तात्रय हरगुडे, वाघोली येथील सामाजिक कार्यकर्ते हिरामण वाघमारे, तुशार सातव, जगदिश बजाज, कमलेश बहिरट, गणेश जाधव, प्रकाश नागरवाड, पंडित कोलते, संजय टकले, वाघोली वाहतूक विभागाचे प्रमुख अधिकारी किशोर तणपुरे, विक्रम घडदे, गणेश हरगुडे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा वाघोली–केसनंद–लोणिकंद परिसरातील वाहतूक कोंडी ही केवळ काही व्यक्तींची समस्या नसून हजारो नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित गंभीर समस्या आहे. त्यामुळे नागरिकांनी या प्रश्नासाठी एकत्र येऊन वाहतूक नियमांचे पालन करावे, वाहतूक कोंडीच्या ठिकाणांची माहिती, फोटो व व्हिडिओ कृती समितीच्या माध्यमातून संबंधित विभागापर्यंत पोहोचवावेत, असे आवाहन करण्यात आले. "तात्पुरती वाहतूक व्यवस्था नको, तर वाघोली–केसनंद–लोणिकंद परिसरातील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा हवा," अशी ठाम भूमिका पुणे नगर रोड वाघोली–केसनंद वाहतूक कृती समितीच्या बैठकीत घेण्यात आली.